रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

♦ वर्ष १८ ♦ अंक ३३८
www.ramprahar.com

♦ शुक्रवार, २६ जून २०२६ ♦ पाने ८ ♦ किंमत ₹ २

## अंतरंग

रायगड जिल्ह्यात स्टॉप डायरिया अभियान/२
खोपोलीतील रहिवासी दारू दुकानाविरोधात आक्रमक/५
नागोठण्यातील खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड/८

## व्हेनेझुएलामध्ये विनाशकारी भूकंप; अनेकांचा मृत्यू



**कराकस :** दक्षिण अमेरिकेतील व्हेनेझुएलामध्ये अवघ्या ३९ सेकंदांच्या अंतराने झालेल्या दोन शक्तिशाली भूकंपांनी प्रचंड खळबळ उडाली आहे. रिक्टर स्केलवर ७.२ आणि ७.५ तीव्रतेच्या या जुळ्या भूकंपांमुळे राजधानी कराकससह अनेक शहरे हादरली. या नैसर्गिक आपत्तीत रस्ते मधोमध दुभंगले असून अनेक इमारतींना मोठे तडे गेले, तर काही घरे पत्त्यासारखी कोसळली आहेत. प्राथमिक अंदाजानुसार मृतांचा आकडा १० हजारांच्या वर असू शकतो, अशी भीती वर्तवण्यात आली आहे. या भूकंपाचे धक्के व्हेनेझुएलाच्या अनेक राज्यांसह शेजारील कोलंबिया देशातील काही भागांमध्येही जाणवले. व्हेनेझुएलाचे अंतर्गत मंत्री डीओस्डाडो कॅबेलो यांनी सांगितले की, प्रशासन सध्या नुकसानीचा आढावा घेत असून बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. दरम्यान, भूकंपांचे व्हिडीओ सोशल मीडियावर समोर आले आहेत.

# कोकणातील वणव्यांवर आमदार प्रशांत ठाकूर आक्रमक

## कठोर उपाययोजना करणार; वनमंत्री गणेश नाईक यांची अधिवेशनात घोषणा

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकणातील आंबा व काजू बागांचे वणव्यांमुळे होत असलेले मोठे नुकसान आणि वनगुन्ह्यांमधील कारवाईचा प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधानसभेत आक्रमकपणे उपस्थित केल्यानंतर राज्य सरकारने वनक्षेत्रात आग लावणे अथवा वणवे लावण्याच्या घटनांना पूर्णपणे आळा घालण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. वनमंत्री गणेश नाईक यांनी या संदर्भात कठोर उपाययोजनांची घोषणा केली.

भविष्यकाळात महाराष्ट्रातील कोणत्याही वनक्षेत्रात आग लावणे किंवा वणवे लावण्याला पूर्णपणे आळा घालण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण माहिती वनमंत्री नाईक यांनी विधानसभेत दिली. वनसंपदेचे संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि वन्यजीवांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने राज्य सरकार कठोर उपाययोजना राबविणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



कोकणातील काजू आणि आंबा बागांमध्ये लागणाऱ्या वणव्यांचा प्रश्न अत्यंत गंभीर असून त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचा मुद्दा आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात उपस्थित केला. वणव्यांच्या घटनांमध्ये हजाराहून अधिक वनगुन्हे नोंदविले गेले असतानाही दोषींवर ठोस कारवाई का होत नाही, असा सवाल त्यांनी शासनाला विचारला.

सभागृहात बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी शेतकऱ्यांचा प्रश्न पोटतिडकीने मांडला. त्यांनी मुद्दा उपस्थित करताना म्हटले की, यावर्षी अवकाळी पाऊस आणि विविध नैसर्गिक कारणांमुळे आंबा व काजू उत्पादक शेतकरी आधीच संकटात सापडले आहेत. त्यातच वन विभागाच्या हद्दीत लागणाऱ्या आगींमुळे लगतच्या खासगी आंबा-काजू बागादेखील जळून खाक झाल्याच्या घटना वाढल्या आहेत. शासनाच्या उत्तरात खासगी क्षेत्रातील आगींसाठी वन विभाग जबाबदार नसल्याचे नमूद करण्यात आले असले, तरी वनक्षेत्रात १,१३८ आगीच्या घटना घडल्याचे आणि संबंधितांवर वनगुन्हे दाखल झाल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. यावर आमदार प्रशांत ठाकूर यांनी, दाखल झालेल्या वनगुन्ह्यांपैकी किती प्रकरणांमध्ये दोषसिद्धी झाली, किती तपास पूर्ण झाले, किती जणांवर दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आणि प्रत्यक्ष कारवाई किती झाली याची माहिती सभागृहात मागितली. केवळ गुन्हे नोंदवून प्रश्न सुटणार नसून दोषींना शोधून त्यांच्यावर कठोर कारवाई होणे आवश्यक असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. (पान २ वर..)

## नसरापूर अत्याचारप्रकरणी आरोपी भीमराव कांबळे दोषी

■ २९ जूनला न्यायालय सुनावणार शिक्षा

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील भोरजवळील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर झालेल्या अत्याचार प्रकरणातील आरोपी भीमराव कांबळेला न्यायालयाने दोषी ठरवले आहे. या प्रकरणी शिक्षेची सुनावणी २९ जून रोजी सुनावली जाणार आहे.

या प्रकरणाची सुनावणी अत्यंत जलद गतीने पार पडली. गुन्हा घडल्यापासून अवघ्या काही आठवड्यांतच तपास यंत्रणा आणि न्यायालयाने सर्व प्रक्रिया पूर्ण केली असून गुरुवारी (दि.२५) नराधम भीमराव कांबळेला न्यायालयाने दोषी ठरवले.

न्यायाधीश एस.आर. साळुंखे यांनी निकाल देताना म्हटले की, दुर्मिळातील दुर्मीळ असे हे प्रकरण आहे. आरोपी भीमराव कांबळेने केलेला गुन्हा क्रूर आणि अमानुष आहे. पीडितेच्या अंगावरील जखमा, अत्याचार पाहता ही घटना अमानवीय आहे. त्यांनी शेवटी स्पष्ट केले की, निष्पाप लहान मुलीच्या न्याय हक्कासाठी हा निकाल अत्यंत महत्त्वाचा आहे. दरम्यान, सरकारी वकिलांनी आरोपीला कठोरात कठोर शिक्षा सुनावण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

## अवकाळी पाऊस, गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना मदत द्या

■ आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांची विधिमंडळात मागणी

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यातील अवकाळी पाऊस, भीषण गारपीट, वादळी वारे आणि बदलत्या हवामानामुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीचा गंभीर प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे उपस्थित केला. या प्रश्नाच्या माध्यमातून नाशिक, कोकण, रायगड, विदर्भ, मराठवाडा, लातूर, यवतमाळ, गडचिरोली, अहिल्यानगर, सांगली, संभाजीनगर व बीड यांसह विविध जिल्ह्यांमध्ये मार्च-एप्रिल २०२६मध्ये झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतमाल,




फळबागा, घरे, जनावरे तसेच जीवित व वित्तहानी झाल्याचा मुद्दा अधोरेखित करण्यात आला.

राज्यातील अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल करून शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शासनाचे लक्ष वेधले. राज्यात विशेषतः नाशिक, कोकण, रायगड, विदर्भ, मराठवाडा, लातूर, यवतमाळ, गडचिरोली, अहिल्यानगर, सांगली, संभाजीनगर व बीड यासारख्या अनेक जिल्ह्यात माहे मार्च-एप्रिल २०२६मध्ये झालेला अवकाळी पाऊस, भीषण गारपीट, वादळी वारा, बदललेले हवामान व इतर नैसर्गिक आपत्ती, मोठ्या प्रमाणात जीवित व वित्त हानीसह शेतमाल, घरे, जनावरे, पीक, फळ बाग व फळांवरील रोगांचा प्रादुर्भाव, पशुधन व जनावरांचा मृत्यू इत्यादी स्वरूपाचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आल. ग्रामीण भागात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असून पावसामुळे वाळवणीसाठी ठेवलेल्या हळदीचे नुकसान, बऱ्याच ठिकाणी वीज पडून व नैसर्गिक आपत्तीमुळे दगावल्याची नोंद प्रशासनाकडे प्राप्त झाली. नैसर्गिक आपत्तीमुळे महसूल व कृषी विभागाकडून पाहणी करून त्यानंतर पंचनाम्याची प्रक्रिया सुरू न झाल्यामुळे तसेच संबंधित पथके गावांमध्ये अनुपस्थित असल्याने पंचनामे पूर्ण झाले नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय? असल्यास अनेक ठिकाणी झालेल्या नुकसानीचे पंचनामे पूर्ण करण्यास विलंब होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून मदत निधी वितरणासाठी (पान २ वर..)

## देशात आणीबाणीच्या काळात संविधानाची हत्या -पंतप्रधान नरेंद्र मोदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आणीबाणीच्या ५१व्या वर्षाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या इतिहासातील हा सर्वात काळा अध्याय असल्याचे म्हटले आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत त्यांनी २५ जून १९७५ हा दिवस 'संविधान हत्या दिन' म्हणून अधोरेखित केला आणि आणीबाणीच्या काळात लोकशाही मूल्यांचे रक्षण करणाऱ्या सर्व नागरिकांना, नेत्यांना आदरांजली वाहिली.

पंतप्रधान मोदींनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले की, आणीबाणी हा भारताच्या राज्यघटनेवर झालेला थेट आणि क्रूर हल्ला होता. या काळात नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर गदा आणली गेली, अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करण्यात



आली आणि विरोधी पक्षांचे नेते, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते यांना विनाकारण तुरूंगात डांबण्यात आले. लोकशाहीचा कणा असणाऱ्या न्यायव्यवस्था आणि प्रसारमाध्यमांसारख्या महत्त्वाच्या संस्थांवर या काळात मोठा आघात झाला होता.

पंतप्रधान मोदींनी आणीबाणीच्या काळोखातही लोकशाहीचा दिवा तेवत ठेवणाऱ्या सामान्य नागरिकांच्या धैर्याचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले, या भीषण संकटाच्या काळातही देशातील असंख्य नागरिकांनी अन्यायकारक व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवला. त्यांनी शांत बसण्यास नकार दिला आणि संविधानाने दिलेल्या मूल्यांचे रक्षण केले. हे नागरिक लोकशाहीचे खरे रक्षक आहेत.

पंतप्रधानांनी पुढे नमूद केले की, आपली राज्यघटना ही केवळ एक कायदेशीर दस्तऐवज नसून १४० कोटी भारतीयांच्या आकांक्षा, हक्क आणि कर्तव्यांचे प्रतीक आहे. सरकार संविधानाच्या मूल्यांचे रक्षण करण्यासाठी कटिबद्ध आहे. संविधानाच्या मूळ भावनेनुसार चालत भारत देश न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांवर पुढे जाईल आणि एक मजबूत राष्ट्र बनेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## निवडक

### 'ॲमेझॉन' भारतात करणार ४८ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक

**नवी दिल्ली :** अमेरिकेतील आघाडीची ई-कॉमर्स कंपनी 'ॲमेझॉन'चे मुख्य कार्यकारी अधिकारी अँडी जॅसी यांनी गुरुवारी (दि. २५) नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी ॲमेझॉनतर्फे भारतात २०२६ ते २०३० या कालावधीत आपल्या व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी एकूण ४८ अब्ज डॉलर्सची (सुमारे चार लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त) गुंतवणूक करण्याची मोठी घोषणा केली.

### अभिनेत्रीच्या घरात उद्योगपतीचा मृतदेह

**बंगळुरू :** प्रसिद्ध कन्नड अभिनेत्री कृषी थपंडा हिच्या बंगळुरूमधील राजराजेश्वरी नगर येथील निवासस्थानी एका तरुण उद्योगपतीने कथितपणे आपले आयुष्य संपविले आहे. वैशाख असे मृत उद्योगपतीचे नाव असून तो गेल्या काही काळापासून नैराश्याचा सामना करत होता, अशी माहिती पोलिसांनी दिली. घटनेच्या वेळी कृषी काही कामानिमित्त यलहंका येथे गेली होती आणि घरात कोणीही नव्हते. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## 'एफडीए'चे राज्यभर धाडसत्र

### ३४.६६ कोटींचा प्रतिबंधित, भेसळयुक्त माल जप्त

**मुंबई : प्रतिनिधी**

अन्न व औषध प्रशासनाने (एफडीएने) महिनाभरात म्हणजे २५ मे ते २४ जून या कालावधीत राज्यभर व्यापक धडक मोहीम राबवत प्रतिबंधित गुटखा, पानमसाला, भेसळयुक्त अन्नपदार्थ, बनावट औषधे, वैद्यकीय उपकरणे आणि विनापरवाना व्यवसायांविरोधात मोठी कारवाई केली. या कालावधीत एकूण ९०४ धाडी टाकण्यात आल्या असून तब्बल ३४ कोटी ६६ लाख ९० हजार ६२४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाल्याविरोधात ४४६ कारवाया करण्यात आल्या. यात ५.५५ कोटी रुपयांचा साठा जप्त करण्यात आला असून ४५७ जणांना अटक, ३२२ आस्थापना सील आणि ४२ वाहने जप्त करण्यात आली आहेत. याशिवाय भेसळयुक्त, निकृष्ट दर्जाचे व असुरक्षित अन्नपदार्थांवर ४३१ कारवाया करण्यात आल्या. आंबे, दुग्धजन्य पदार्थ, खाद्यतेल, मसाले, पॅकेज्ड पिण्याचे पाणी, खवा, बेकरी पदार्थ आणि इतर अन्नपदार्थांचा २९.११ कोटी रुपयांचा साठा जप्त करण्यात आला.

औषध विभागानेही राज्यभर ५५ विशेष कारवाया करत ५.५२ कोटी रुपयांच्या औषधे, वैद्यकीय उपकरणे, सौंदर्यप्रसाधने व इतर उत्पादनांवर जप्ती अथवा प्रतिबंधात्मक कारवाई केली. दिशाभूल करणाऱ्या औषध जाहिरातींविरोधात ३१ कारवाया, विनापरवाना औषध व्यवसायाविरोधात ११ धाडी, तर एनडीपीएस कायद्यांतर्गत स्वतंत्र कारवाया करण्यात आल्या.

या मोहिमेत एकूण नऊ एफआयआर नोंदवण्यात आले असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी जनतेच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्या कोणत्याही बेकायदेशीर कृतीला पाठीशी घातले जाणार नसून अशा प्रकरणांवर कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा दिला आहे.

## शेतीकामांना वेग




**मुरूड :** अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर वरुणराजाने अखेर हजेरी लावल्याने शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील कामांना सुरुवात केली आहे. ग्रामीण भागातील शेतकरी पारंपरिक पद्धतीने बैलजोडीच्या सहाय्याने नागंरणी करीत आहेत. त्याचे सुधीर नाझरे यांनी टिपलेले छायाचित्र.

## मराठा आरक्षण कक्षाची स्थापना

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे प्रभावी सनियंत्रण, आरक्षणासंदर्भातील न्यायालयीन प्रकरणांचे समन्वयन, मंत्रिमंडळ उपसमितीच्या कामकाजाचे व्यवस्थापन तसेच अनुषंगिक कामांसाठी स्वतंत्र मराठा आरक्षण कक्ष हे नवीन कार्यासन स्थापन करण्यात करण्यात आला आहे.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनादरम्यान मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार कार्यवाही झाली. सामान्य प्रशासन विभागांतर्गत हा कक्ष काम करेल.



# घरकुल लाभार्थ्यांच्या रखडलेल्या हप्त्यांवर आमदार प्रशांत ठाकूर यांचा विधानसभेत आवाज

## घरकुल योजनांतील निधीवाटप आणि बांधकाम प्रक्रियेला गती -मंत्री जयकुमार गोरे

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना तसेच इतर घरकुल योजनांतील प्रलंबित कामे आणि लाभार्थ्यांना मिळणाऱ्या हप्त्यांमधील विलंबाचा मुद्दा आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे उपस्थित करून या विषयावर शासनाचे लक्ष केंद्रित केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्यातील घरकुल योजनांच्या अंमलबजावणीतील विलंब, लाभार्थ्यांना वेळेवर निधी न मिळणे, 'स्पर्श' प्रणालीतील तांत्रिक अडचणी, बांधकाम साहित्याच्या वाढत्या किमती आणि त्यामुळे अपूर्ण राहिलेल्या घरकुलांचा प्रश्न सभागृहात मांडला. प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण)-२ अंतर्गत मंजूर घरांपैकी केवळ १२ टक्के घरे पूर्ण झाली असून उर्वरित २४ लाख २९ हजार ९९८ घरकुलांची कामे प्रलंबित असल्याकडे त्यांनी शासनाचे लक्ष वेधले. रायगड, सिंधुदुर्ग, चंद्रपूर, जळगाव, सोलापूर, कोल्हापूर, लातूर, वाशिम, पालघर, नांदेड, परभणी, जालना आणि नागपूरसह विविध जिल्ह्यांतील हजारो घरकुलांची कामे अपूर्ण असल्याचे निदर्शनास आणून देत लाभार्थ्यांना दुसरा, तिसरा व पुढील हप्ता वेळेत मिळत नसल्याची बाबही त्यांनी अधोरेखित केली. त्या अनुषंगाने आमदार समीर कुणावार आणि आमदार निलेश राणे यांनी सभागृहात उपप्रश्न उपस्थित केले.




आमदार प्रशांत ठाकूर यांच्या तारांकित प्रश्नाला ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हटले की, प्रधानमंत्री आवास योजना या योजनेंतर्गत SNA SPARSH प्रणाली लागू झाली. सदर योजनेसाठी माहे एप्रिल, २०२६ ऐवजी माहे मे, २०२६ मध्ये निधी प्राप्त झाला. केंद्र व राज्य पुरस्कृत आवास योजनेसाठी पर्याप्त निधी उपलब्ध असून लाभार्थ्यांच्या खात्यात वर्ग केला जात आहे. वाढत्या महागाईचा विचार करून राज्याने दिनांक ०४ एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये टप्पा-२ मधील लाभार्थ्यांना ५० हजार रुपये अतिरिक्त अनुदान मंजूर केले आहे.

या शिवाय राज्याने दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये घरकुल लाभार्थ्यांना ५ ब्रास वाळू मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तांत्रिक अडचणी सोडवून SNA SPARSH प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात हप्ते वितरणाची प्रक्रिया ऑनलाईन होत असल्याने लाभार्थ्यांना पाठपुरावा करण्याची आवश्यकता राहिलेली नाही. तात्पुरत्या निवाऱ्यात राहणाऱ्या लाभार्थ्यांना प्राधान्य देऊन त्यांचे घरांचे बांधकाम पावसाळ्यापूर्वी कालबध्द नियोजन करुन छताच्या पातळीपर्यंत पूर्ण करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गृहनिर्माण अभियंता, ग्रामसेवक यांचेद्वारे थेट बांधकामावर भेट देवून मार्गदर्शन व सहाय्य केले जात आहे, जेणेकरून लाभार्थ्यांची गैरसोय होणार नाही.

राज्यातील प्रत्येक नागरिकाला स्वतःचे हक्काचे घर मिळावे यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. घरकुल योजनेच्या निधी बाबत कोणतीही कमतरता नसून लाभार्थ्यांच्या हप्त्यांचे पैसे कोणत्याही परिस्थितीत थांबणार नाहीत, अशी ग्वाही देत राज्यात पुढील एक वर्षांत १५ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत सांगितले. मागील वर्षी राज्याला २९ लाखावर घरांचे उद्दिष्ट मिळाले होते. त्यापैकी २८.१७ लाख लाभार्थी निश्चित करून २७ लाख ८५ हजार ७२४ घरांना मंजुरी देण्यात आली. आतापर्यंत २६ लाख घरांना पहिला, १७ लाख घरांना दुसरा आणि ११ लाख घरांना तिसरा हप्ता वितरित करण्यात आला आहे; आजपर्यंत ६ लाख ५ हजार ५९६ घरे पूर्ण झाली असून एका वर्षात ६ लाख घरे पूर्ण करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. २०२५-२६ मध्ये ५ हजार २९० कोटी रुपये, २०२६-२७ मध्ये १३ हजार ९४७ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. केंद्र सरकारच्या ऑनलाइन निधी वितरण प्रणालीमध्ये अडचणी आल्याने हप्ते देण्यास विलंब झाला; मात्र आता ही प्रक्रिया सुरळीत सुरू झाली आहे.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात व्याख्यानमालेस प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात २५ जून या दिवशी विविध व्याख्यानांचे तसेच स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दरवर्षी जगभर २६ जून हा दिवस 'जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन' म्हणून साजरा केला जातो. याचेच औचित्य साधून २५ जून या दिवशी अंमली पदार्थांच्या दुष्परिणामाविषयी जन जागृती करण्यासाठी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास प्रमुख व्याख्याता म्हणून अ‍ॅन्टी नार्कोटिक्स विभाग, गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक श्री. संदिप निगडे हे लाभले होते. त्यांनी अंमली पदार्थांचे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक परीणाम, त्यावरील कायदेशीर कारवाई तसेच युवकांनी या व्यसंगापासून दूर राहण्याचे महत्व याबाबत सविस्तर माहिती दिली.

तसेच २५ जून हा भारतीय इतिहासातील एक अत्यंत महत्वाचा दिवस असून या दिवशी देशाच्या राजकारणाला कलाटणी देणारी ऐतिहासिक घटना घडली होती. २५ जून हा दिवस आणीबाणी दिवस म्हणून ओळखला जातो. २५ जून या दिवशी तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशांतर्गत आणीबाणी घोषित केली होती.

या काळातील अत्याचाराचे स्मरण म्हणून भारत सरकारने २५ जून हा दिवस 'संविधान हत्या दिवस' म्हणून घोषित केला. या दिवसाचे महत्व आणि दिवसाबदल माहिती देण्यासाठी रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात 'भारतीय आणिबाणी दिवस' या विषयावर मार्गदर्शपर सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रास प्रमुख व्याख्याते म्हणून मुंबई येथील विश्व अध्ययन केंद्र, सेंटर फॉर इंटरनॅशनल स्टडीज तसेच एकल ग्लोबलच्या कार्यकारी समितीशी संलग्न असलेले सदस्य प्रभाकर तिजारे हे होते.सदर व्याख्यानाचे आयोजन केल्याबदल सर्व विद्यार्थ्यांनी प्राचार्य निशा नायर यांचे आभार मानले.





## निवडक

### लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

**पनवेल :** लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार केल्याप्रकरणी आरोपी अयाज परवेज खान (रा. स्वप्नसागर सोसायटी तळोजा फेस टू) याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.यातील पीडित तरुणी सोबत ऑगस्ट २०२४ ते एप्रिल २०२६ दरम्यान तिच्या घरी आरोपी अयाज खान याने पीडितेला वारंवार लग्नाचे आमिष दाखवले आणि तिच्यावर अत्याचार केला.

### प्रवासी भरण्याच्या वादावरून मारहाण

**पनवेल :** रिक्षा प्रवासी भरण्याच्या जुन्या वादावरून मारहाण केल्याप्रकरणी किरण दबडे, आकाशी यमगर आणि आकाश बरणवाल यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.शिवम वानखेडे हा हरिग्राम येथे राहत असून तो आणि त्याचा भाऊ याला रिक्षा प्रवासी भरण्याच्या जुन्यावादावरून किरण दबडे, आकाश यमगर आणि आकाश बरणवाल यांनी शिवीगाळ करून हाताबुक्याने मारहाण केली तसेच रात्री अडीचच्या सुमारास किरण याने शिवम ओरियन मॉल रिक्षा नाक्यावर असलेल्या बांबूच्या काहीठीने डोक्यात मारहाण केली.

### मुलाकडून वडिलांना काठीने मारहाण

**पनवेल :** मुलाने वडिलांना काठी आणि लोखंडी कोयत्याने मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी विकी नारायण विटकर (राहणार सोमटणे) याच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.यातील फिर्यादी नारायण किसन विटकर हे सोमटणे येथे राहत असून त्यांचा मुलगा विकी विटकर याने त्यांना दारूच्या नशेत शिवीगाळ केली आणि लाकडी काठी व लोखंडी कोयत्याने डोक्यावर, तोंडावर मारून त्यांना जखमी केले.

### पनवेलमध्ये कार गेली खड्ड्यात

**पनवेल :** पावसाच्या दमदार हजेरीमुळे पनवेलमधील तक्का परिसरात रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. यावेळी रस्त्यालगतच्या खड्ड्याच्या खोलीचा चालकाला अंदाज न आल्याने एक कार खड्ड्यात अडकली. या घटनेत कारचे मागील दोन्ही टायर हवेत उचलले गेले होते. घटनेनंतर नागरिकांनी तत्काळ मदत करत कारमधील व्यक्तींना सुरक्षित बाहेर काढले. या प्रकारामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी वाहनाचे नुकसान झाले आहे.

# उरणमध्ये २८ जूनला बालकांसाठी पोलिओ लसीकरण अभियान

**उरण : प्रतिनिधी**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय उरण यांच्या वतीने रविवार, २८ जून २०२६ रोजी 'राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण अभियान २०२६' राबवण्यात येणार आहे. या अभियानात ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजण्यात येणार आहेत. सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत ग्रामीण रुग्णालय उरण तसेच तालुक्यातील सर्व पोलिओ लसीकरण केंद्रांवर ही मोहीम राबवली जाणार आहे.




आरोग्य विभागाने सर्व पालक व नागरिकांना आवाहन केले आहे की, आपल्या घरातील तसेच शेजारच्या ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओचे दोन थेंब आवर्जून पाजावेत. यापूर्वी पोलिओ लस घेतली असली तरीही पुन्हा लस देणे आवश्यक आहे, कारण 'दोन थेंब जीवनाचे' हे प्रत्येक बालकासाठी गरजेचे आहेत.

पोलिओमुक्त भारत घडवण्यासाठी नागरिकांच्या सहकार्याची नितांत आवश्यकता असल्याचे ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक यांनी सांगितले आहे.

भारत पोलिओमुक्त झाला असला तरी शेजारील देशांमध्ये पोलिओचे विषाणू अजूनही आहेत. त्यामुळे धोका पूर्णपणे टळलेला नाही. एकही बालक लसीपासून वंचित राहू नये यासाठी ही विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. 'पोलिओमुक्त भारत - सुरक्षित भविष्याची हमी' आणि 'पोलिओमुक्त भारत आपले लक्ष्य' या उद्देशाने हे अभियान राबवले जात आहे. "दोन थेंब जीवनाचे - प्रत्येक बालकासाठी! पोलिओमुक्त भारतासाठी चला हातभार लावूया!" असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

# पनवेलच्या रोहिदास वाडा परिसरातील वीज केबल दुरूस्त; पुरवठा सुरळीत

**पनवेल : वार्ताहर**

शहरातील रोहिदास वाडा परिसरातील आदित्य महादेव, मारुती आर्केड, जय श्रीराम, सनशाईन वसुंधरा तसेच इतर अनेक इमारतींमध्ये काल रात्रीपासून पहाटे ४ वाजेपर्यंत वीज केबलमध्ये बिघाड झाल्याने वीजपुरवठा कमी-जास्त होत होता. परिणामी पाण्याचे पंप आणि लिफ्ट सेवा देखील बंद पडली होती.

या समस्येबाबत आज सकाळी परिसरातील काही रहिवाशांनी नगरसेवक राजू सोनी, प्रभाग अध्यक्ष पवन सोनी तसेच त्यांचे सहकारी मंदार देसाई यांना माहिती दिली. माहिती मिळताच त्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आणि महावितरणचे मुख्य कार्यकारी अभियंता सातपुते यांच्याशी संपर्क साधून पाठपुरावा केला.

यानंतर महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी एमएसईबी कार्यालयाजवळील दत्त मंदिर डीपी ते पोटे मसाले डीपी दरम्यानची खराब झालेली थ्री-फेज केबल बदलून दिली. त्यामुळे परिसरातील वीजपुरवठा सुरळीत झाला असून पाणीपुरवठा आणि लिफ्ट सेवा पूर्ववत सुरू झाली आहे. वीजपुरवठा सुरळीत झाल्यानंतर परिसरातील रहिवासी व विविध सोसायट्यांच्या सदस्यांनी नगरसेवक राजू सोनी, पवन सोनी, मंदार देसाई तसेच महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त केले.



# रायगड जिल्ह्यात शासनातर्फे स्टॉप डायरिया अभियान

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

शुध्द, स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे जलजीवन मिशनअंतर्गत पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमाचा उद्देश आहे. जलजन्य आजार रोखण्याबाबत लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी जिल्ह्यात १६ जून ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत स्टॉप डायरिया अभियान राबविण्यात येत असल्याची माहिती पाणी व स्वच्छता विभागाच्या प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता शुभांगी नाखले यांनी दिली.

या अभियानामध्ये गावातील अंगणवाड्या, प्राथमिक आरोग्य केंद्र, सरकारी कार्यालये व प्राथमिक शाळा येथील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासण्यात येणार आहे. पावसाळ्यामध्ये दूषित पाणी पिऊन डायरिया,गॅस्ट्रो व कावीळ यासारखे अनेक आजार होत असतात त्यामुळे पिण्याचे पाणी निर्जंतुकीकरण करून पिण्यासाठी वापरल्यास या आजारांना दूर ठेवता येणार आहे.

यासाठी गाव स्तरावर विविध उपक्रम घेऊन लोकांच्या मध्ये जनजागृती करण्यात येणार आहे . एकूण सहा आठवडे हे अभियान चालणार असून प्रत्येक आठवड्यात वेगवेगळ्या वेगवेगळे उपक्रम गाव पातळीवर घेण्यात येणार आहेत. पाणी शुद्ध करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवण्यात येणार आहे व शुद्ध पाण्याचे महत्व सांगणेत येणार आहे.

या अभियानामध्ये मुख्यतः पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन व त्याची योग्य हाताळणी, स्वच्छता जागृती कार्यक्रम, पाणी गळतीच्या जागा शोधून त्याची दुरुस्ती करणे, पाणी तपासणी बाबत गाव पातळीवर पोस्टर बॅनर्स लावण्यात येणार आहेत. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत गावातील शाळा, अंगणवाड्या प्राथमिक आरोग्यकेंद्रे येथे स्वच्छता जागृती कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

ग्रामस्थांमध्ये कचऱ्याच्या वर्गीकरणाच्या बाबतीत जागृती निर्माण करणे यासाठी घरोघरी भेटी देऊन, कचऱ्याचे वर्गीकरण करण्यास प्रोत्साहन देणे याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच गावामध्ये घनकचरा नियम २०२६ नुसार कचऱ्याचे योग्य वर्गीकरण व हाताळणी याबाबत विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

पाणीपुरवठा योजनेतील पाणी गळती शोधून त्याची दुरुस्ती करणे, पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता करणे, घरगुती स्तरावरील पाणी साठवणुकीच्या टाक्यांची स्वच्छता करणे, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी नादुरुस्त शौचालयांची दुरुस्ती करणे, पिण्याच्या पाण्याचे स्रोतांची स्वच्छता ठेवणे, वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता याबाबत गावांना सक्षम करण्यासाठी गावातील सर्व घटकांचा या अभियानामध्ये सहभाग घेण्यात येईल.

पान १ वरुन

## कोकणातील वणव्यांवर आमदार प्रशांत ठाकूर आक्रमक

वणवे रोखण्यासाठी केवळ जनजागृती पुरेशी नसल्याचे नमूद करत वारंवार आग लागणाऱ्या भागांमध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि जबाबदार व्यक्तींवर कडक कारवाई करण्याची गरज असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधोरेखित केले तसेच पेंच व्याघ्र प्रकल्पात वापरल्या जाणाऱ्या रिअल-टाइम मॉनिटरिंग सिस्टीम, एआय-आधारित कॅमेरे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कोकणातील वनक्षेत्रातही करण्याचा विचार शासनाने करावा, अशी मागणीवजा सूचना केली.

यावर उत्तर देताना राज्याच वनमंत्री गणेश नाईक यांनी कोकणातील वणव्यांचा प्रश्न गंभीर असल्याची कबुली दिली. पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये वणव्यांच्या घटना वारंवार घडत असल्याचे त्यांनी सांगितले. वनमंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार यंदा ठाणे वनविभागात १,००९ वणव्यांच्या घटनांमध्ये सुमारे १,६५९ हेक्टर क्षेत्र जळाले आहे. कोल्हापूर प्रादेशिक विभागात ३४ घटनांमध्ये ८५ हेक्टर, तर मुंबई पश्चिम विभागात ९५ घटनांमध्ये १४५ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. राज्यभरात वणव्यांशी संबंधित १,२२६ वनगुन्हे नोंदविण्यात आले असून त्यांचा तपास सुरू आहे.

वणव्यांची प्रमुख कारणे म्हणून शेतीतील पाला-पाचोळा जाळणे, विडी-सिगारेटची थोटके निष्काळजीपणे फेकणे, तसेच शिकारीसाठी किंवा जंगलातील फळे-फुले गोळा करण्यासाठी जाणीवपूर्वक आग लावणे यांचा उल्लेख वनमंत्र्यांनी केला. शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी ग्रामपंचायत, ग्रामसभा, लोकप्रतिनिधी आणि विविध शासकीय यंत्रणांच्या माध्यमातून मोहीम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. पेंच व्याघ्र प्रकल्पात वापरल्या जाणाऱ्या रिअल-टाइम मॉनिटरिंग सिस्टीमप्रमाणे सर्व यंत्रणा राबविण्यात सुरुवात झाली असून वन विभागाने कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वणव्यांबाबत सतर्कता वाढविण्याचे काम सुरू केले आहे.

भविष्यात वन विभाग आणि कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना प्रशिक्षण, अग्निशमन साधने आणि ब्लोअर यांसारखी यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्याचे नियोजनही करण्यात येत आहे, असे सांगण्यात आले.

दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर यांनी महसूल, कृषी, पोलीस आणि वन विभाग यांच्या समन्वयातून दोषींना शोधून कठोर कारवाई करण्याची मागणी केली. त्यावर प्रतिसाद देताना वनमंत्री गणेश नाईक यांनी संबंधित विभागांची संयुक्त बैठक घेऊन प्रतिबंधात्मक आणि प्रभावी उपाययोजनांबाबत आवश्यक सूचना देण्याचे आश्वासन सभागृहात दिले.

## अवकाळी पाऊस, गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना मदत द्या

कालबद्ध कार्यक्रम निश्चित करणे, पीक विमा योजनेची व्याप्ती वाढविणे, डीबीट अर्थात थेट लाभ हस्तातंरण पद्धतीने मदत रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करणे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्यासाठी शासनाने पंचनामे पूर्ण करण्याबाबत जिल्हा प्रशासनास विशेष निर्देश दिले आहेत काय? असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय? त्या अनुषंगाने हवामानाच्या अंदाजाची अचूकता सुधारण्यासह नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना व पशुपालकांना आर्थिक मदत, पीकविमा, जनावरांच्या नुकसानीची भरपाई देणे, मृतांच्या वारसांना मदत तसेच वीजपुरवठा पूर्ववत व वीज प्रतिबंधक यंत्र बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न दाखल केला होता.

यावर राज्याचे मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद जाधव (पाटील) यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हटले की, राज्यात विशेषतः नाशिक कोकण, रायगड, विदर्भ, मराठवाडा, लातूर, यवतमाळ, गडचिरोली, हिल्यानगर सांगली, संभाजीनगर व बीड यासारख्या अनेक जिल्ह्यात माहे मार्च-एप्रिल २०२६मध्ये झालेला अवकाळी पाऊस, भीषण गारपीट, वादळी वारा, बदललेले हवामान व इतर नैसर्गिक आपत्ती, मोठ्या प्रमाणात जीवित व वित्त हानीसह शेतमाल, घरे, जनावरे, पीक, फळ बाग व फळांवरील रोगांचा प्रादुर्भाव, पशुधन व जनावरांचा मृत्यू इत्यादी स्वरुपाचे नुकसान झाले असल्याचे खरे आहे. हळदीचे नुकसान झाल्याची बाब आढळून आलेली नाही. काही ठिकाणी वीज पडून व नैसर्गिक आपत्तीमुळे जीवित हानी झाली आहे. बाधित क्षेत्राचे पंचनामे पूर्ण करुन पात्र लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात डिबीटी प्रणालीद्वारे निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरू आहे.

नैसर्गिक आपत्तीमध्ये मनुष्यहानी झाल्यास मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांना सहाय्य व जखमींना तातडीने मदत करणे शक्य व्हावे तसेच पशुहानी झाल्यास पशुधन खरेदीसाठी शेतकऱ्यांना मदत वाटप करणे शक्य व्हावे म्हणून उणे प्राधिकार पत्रावर कोषागारातून रक्कम आहरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हास्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. वीजपुरवठा खंडित झाल्याबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारीची नोंद घेऊन महावितरणकडून तत्काळ दुरूस्तीची प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये वाटप करण्याची कार्यवाही सुरू आहे, असेही मंत्री मकरंद जाधव (पाटील) यांनी लेखी उत्तरात सांगितले आहे.

## राज्यातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना लागू असलेल्या

# बल्क ग्राहक डिझेल वर्गीकरणात बदल करा

### आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांचा तारांकित प्रश्न

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्यातील मुंबईसह कोकण किनारपट्टीवरील जिल्ह्यांतील मच्छिमारांचे उपजीविकेचे मुख्य साधन असलेल्या मत्स्यव्यवसायासंदर्भात महत्त्वाचा मुद्दा आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे उपस्थित केला. राज्यातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना लागू असलेल्या “बल्क ग्राहक” डिझेल वर्गीकरणात बदल करण्याचीही मागणी त्यांनी या तारांकित प्रश्नाच्या




माध्यमातून केली.

या प्रश्नामध्ये मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना “बल्क ग्राहक” म्हणून वर्गीकृत केल्यामुळे त्यांना उच्च दराने डिझेल खरेदी करावे लागत असल्याने मच्छिमारांवर मोठा आर्थिक बोजा पडत असल्याचा मुद्दा मांडण्यात आला आहे. उरण तालुक्यातील मोरा व करंजा बंदरातील पर्ससीन नेट व खोल समुद्रातील मासेमारी करणाऱ्या सुमारे ३०० बोटींच्या संचालनासाठी मोठ्या प्रमाणात डिझेलची गरज भासत असून, दरवाढीमुळे मासेमारी व्यवसायावर गंभीर परिणाम झाल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले. तसेच डिझेल दरवाढ आणि सवलतींचा अभाव यामुळे पारंपरिक व लघु मच्छिमारांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याचे नमूद करण्यात आले.

या प्रश्नावर राज्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हंटले कि, राज्यातील मच्छिमार सहकारी संस्थाना पुरवठा करण्यात येणारा डिझेल हा घाऊक दर (Bulk rates) या प्रवर्गातुन करण्यात येत आहे.

मागील काही दिवसापासून सुरु असलेल्या अमेरिका व इराण युध्दाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या इंधन तुटवड्यामुळे देशामध्ये इंधनाचे दर वाढलेले आहेत, ही वस्तुस्थिती आहे. त्यानुसार महाराष्ट्रामध्ये डिझेलचे घाऊक दर (Bulk rates) किरकोळ दरांपेक्षा लक्षणीयरीत्या अधिक झालेले आहेत. याचा काही अंशी परिणाम मासेमारी व्यवसायावर झालेला आहे. डिझेल दर वाढ झालेली असल्यामुळे उपजीविकेचे प्राथमिक साधन असलेल्या मच्छिमारांवर इंधनाच्या वाढीव खर्चाचा बोजा पडत आहे, ही वस्तुस्थिती आहे. सदरची दर वाढ झालेली असल्यामुळे याचा परिणाम मासेमारी व्यवसायावर झालेला असल्याने सदरची दर वाढ कमी करण्याबाबत मच्छिमार सहकारी संस्था यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आलेली आहेत.

## घर खरेदीच्या नावाखाली ६३ लाखांची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमधील एका सदनिकेच्या व्यवहारात तब्बल ६३ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी खारघर पोलिसांनी दोन बांधकाम व्यावसायिकांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दहिसर येथील प्रकाश जगराम मिश्रा (वय ६९) यांनी २०१५ मध्ये खारघर सेक्टर-३५ मधील ड्रीम कॉर्नर इमारतीतील रूम क्रमांक १०१ खरेदीसाठी ६३ लाख रुपये अदा केले होते. हा व्यवहार नोंदणीकृत दस्तऐवजाद्वारे त्यांच्या नावावर करण्यात आला होता. तथापि, सदनिकेचा प्रत्यक्ष ताबा न देता संबंधित सदनिका दुसऱ्याच व्यक्तीला विकण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणात अरशद कुरेशी आणि मेहबाज कुरेशी (मालक, मेसर्स जन्नत एंटरप्रायझेस) यांच्यावर फसवणुकीचे आरोप करण्यात आले आहेत. तसेच, घेतलेली रक्कमही परत न केल्याने आपली फसवणूक झाल्याचे फिर्यादीने नमूद केले आहे. न्यायालयाच्या निर्देशानंतर खारघर पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. नवी मुंबई आणि पनवेल परिसरात घरांच्या वाढत्या किमतीमुळे खरेदी-विक्री व्यवहारांमध्ये फसवणुकीचे प्रकार वाढत असल्याने नागरिकांनी मालमत्ता व्यवहार करताना आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करूनच व्यवहार करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## रोटरी क्लबतर्फे केव्ही कन्या हायस्कूलला सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील के. व्ही. कन्या हायस्कूलमध्ये रोटरी क्लबच्या वतीने सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन प्रदान करून सामाजिक उत्तरदायित्व उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला.

या कार्यक्रमाला क्लबचे अध्यक्ष निलेश पोटे, हितेश राजपूत, व्ही. सी. म्हात्रे, चारूदत्त भगत, ऋग्वेद कांडपीळे तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद आणि विद्यार्थिनी यांच्या उपस्थितीत हा उपक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थिनींच्या आरोग्य व स्वच्छतेच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण असल्याचे यावेळी मान्यवरांनी नमूद केले. कार्यक्रमा दरम्यान शाळेच्या मुख्याध्यापिकांनी व्ही. सी. म्हात्रे, अध्यक्ष निलेश पोटे तसेच रोटरी क्लबचे आभार व्यक्त करत त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. उपस्थितांनीही या उपक्रमाचे स्वागत करत अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली.




# पनवेल महापालिकेतर्फे एकल महिला दिन कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या बालविकास विभागाच्या वतीने सूचित केल्यानूसार पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या सभापती ममता म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली ‘आंतरराष्ट्रीय विधवा दिनानिमित्त’ मंगळवार दिनांक २३ जून रोजी “एकल महिला दिवस” कार्यक्रमाचे आयोजन जेष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात करण्यात आले होते.

महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.यावेळी महापालिका अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, महापालिका सदस्या दर्शना भोईर, रूचिता लोंढे, प्रिती जॉर्ज, स्नेहल ढमाले, बायजा बारगजे, डॉ. प्रियंका कांडपिळे, प्रतिभा म्हात्रे, सरस्वती काथारा, अस्मिता घरत, टाटा इन्स्टिट्युटच्या स्वयंरोजगार उपजिविका




तज्ज्ञ स्नेहल विचारे, उपायुक्त मंगला माळवे, अधिकारी कल्पना भामरे , अधिक्षक कविता मोकल, समाजविकास तज्ज्ञ स्वप्नाली चौधरी, डेएनयुएलएम व्यवस्थापक विनया म्हात्रे, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना सभापती ममता म्हात्रे म्हणाल्या, एकल महिलांच्या समस्या सोडविण्यावर महापालिका भर देत आहे. महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाकडे एकल महिलांनी त्यांच्या सूचना, अडीअडचणी यांची नोंद करावी. या सुचना महापालिका शासनाकडे पाठवेल, शासनाच्या प्रस्तावित एकल महिला धोरणांमध्ये याचा समावेश केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे यांनी महापालिकेच्या महिला विषयक धोरणांसंबधित माहिती दिली. तसेच महिलांनी स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने त्यांच्या काही स्वयंरोजगार संबधित संकल्पना असतील तर त्या मांडाव्यात ,म्हणजे त्यादृष्टीने महापालिका योजना राबवू शकेल असे सांगितले. यावेळी उपायुक्त मंगला माळवे यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जयंती वर्षानिमित्ताने त्यांनी केलेल्या कामाचा थोडक्यात परिचय करून दिला. तसेच महात्मा फुले यांनी विधवा महिलांच्या (एकल महिलांच्या) सक्षमीकरणासाठी त्यांनी केलेल्या कार्याची माहिती दिली.

टाटा इन्स्टिट्युटच्या स्वयंरोजगार उपजिविका तज्ज्ञ स्नेहल विचारे यांनी सध्याच्या काळानुरूप आवश्यक अशा विविध रोजगार विषयीची माहिती महिलांना दिली. तसेच जिल्हा महिला बालविकास कार्यालयाच्या अधिकारी कल्पना भामरे यांनी सांगितले की, शासन एकल महिलांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील आहे. महिला व बालकल्याण विभागाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती त्यांनी दिली. तसेच यावेळी प्रस्तावित शासनाच्या एकल महिला धोरणाबाबत माहिती दिली. डेएनयुएलएम व्यवस्थापक विनया म्हात्रे यांनी महापालिका बचतगटाच्या माध्यमातून करत असलेली कामे, डेएनयुएलम विभागाच्या माध्यमातून देत असलेली प्रशिक्षणे याविषयीची माहिती दिली. तसेच बचत गट नोंदणी, बचत गटांच्या माध्यमातून रोजगार निर्मितीबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी उपस्थित महिलांच्या शासकीय कागदपत्रांबाबतच्या अडचणी जाणून घेऊन आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.

## आदिवासी रुग्णावर मोफत हृदय शस्त्रक्रिया; आयुष्मान भारत कार्ड ठरले 'संजीवनी'

**पनवेल : वार्ताहर**

'योग्य वेळी दिलेली मदत एखाद्याचे आयुष्य बदलू शकते' याचा प्रत्यय पुन्हा एकदा पनवेलमध्ये आला आहे. नेरे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अंतर्गत येणाऱ्या मोरबे गावच्या आशा सेविका निर्मला दाभणे यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे आणि अथक परिश्रमातून आयुष्मान भारत योजनेचा लाभ खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचवत एका रुग्णाला नवीन आयुष्य मिळवून दिले आहे.

मोरबे येथील आदिवासी वाडीत राहणाऱ्या एका रुग्णास हृदयाची झडप बदलण्याची तातडीची व अत्यंत महत्त्वाची



शस्त्रक्रिया करण्याची आवश्यकता होती. या मोठ्या उपचारासाठी डॉक्टरांनी सुमारे ५ लाख इतका खर्च अपेक्षित असल्याचे सांगितले होते. मात्र, संबंधित कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने एवढी मोठी रक्कम उभी करणे आणि हा खर्च सोसणे त्यांच्यासाठी पूर्णपणे अशक्य होते. यामुळे कुटुंब अत्यंत हतबल झाले होते.

रुग्णाची ही गंभीर परिस्थिती आणि कौटुंबिक अडचण लक्षात घेऊन आशा सेविका निर्मला दाबणे यांनी पुढाकार घेतला. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत रुग्णाला वेळेवर 'आयुष्मान भारत कार्ड' उपलब्ध करून देण्यासाठी विशेष आणि प्रामाणिक प्रयत्न केले.

त्यांच्या या प्रयत्नांना यश आले आणि रुग्णाचे आयुष्मान कार्ड वेळेत तयार झाले. या कार्डच्या आधारे नेरूळ येथील डी. वाय. पाटील हॉस्पिटलमध्ये रुग्णावर अत्यंत अवघड अशी हृदय शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत आणि यशस्वीरीत्या पार पडली.

केवळ एका आयुष्मान भारत कार्डमुळे या गरीब कुटुंबाचा तब्बल ५ लाखांचा मोठा आर्थिक भार वाचला आहे. आरोग्य उपचारांवर स्वतःच्या खिशातून करावा लागणारा खर्च या कार्डमुळे शून्य झाला, ज्यामुळे या कुटुंबाला खूप मोठा दिलासा मिळाला आहे.

आशा सेविकांचे समर्पण, त्यांची मेहनत आणि लोकसेवेची प्रामाणिक भावना ही अनेक गरीब व गरजू कुटुंबांना कशी नवसंजीवनी देऊ शकते, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. या उल्लेखनीय आणि सेवाभावी कार्याबद्दल निर्मला सुरेश दाभणे यांचे सर्व स्तरातून मनःपूर्वक अभिनंदन व कौतुक होत आहे.




## उरणच्या तोगरे दाम्पत्याचा समाजोपयोगी उपक्रम; ३४८ प्रकारची औषधे केली दान



**उरण : बातमीदार**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक आरोग्य केंद्र, जीते येथे उरण मधील जेष्ठ समाजसेवक एस. आर. तोगरे तथा समाजसेविका सुमनताई संग्राम तोगरे महाराष्ट्र शासन पुरस्कारित यांच्या वतीने ३४८ प्रकारची औषधे मोफत दान करण्यात आली. या औषधांची अंदाजे किंमत सुमारे एक ते सव्वा लाख रुपये आहे.

ग्रामीण भागातील रुग्णांना आवश्यक औषधे सहज उपलब्ध व्हावीत तसेच आरोग्य सेवेला बळकटी मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या औषधदानामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णांना मोठा लाभ होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. अपर्णा माळगे, औषध निर्माण अधिकारी श्रीमती रुपाली म्हात्रे, लॅब टेक्निशियन श्रीमती प्रियांका लोहार, आरोग्य निरीक्षक उदय म्हात्रे व राजेश म्हात्रे, आरोग्य सेवक भूषण पाटील, स्टाफ नर्स श्रीमती सुनीता गवळी, स्त्री परिचर श्रीमती ज्योत्स्ना दळवी तसेच सफाई कामगार श्रीमती प्रफुल्ला नाईक उपस्थित होते.

उपस्थितांनी जेष्ठ समाजसेवक एस. आर. तोगरे व जेष्ठ समाज सेविका सुमनताई संग्राम तोगरे यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत या उपक्रमाचे स्वागत केले.विशेष म्हणजे, तोगरे दांपत्याने आजपर्यंत महाराष्ट्रातील २५ जिल्ह्यांतील १६८ शासकीय रुग्णालये तसेच अनेक नोंदणीकृत सामाजिक संस्थांना दोन कोटी रुपयांहून अधिक किमतीची औषधे दान केली आहेत.

## मंगळसूत्र खेचून चोरटा झाला पसार

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे येथील सोसायटीच्या पायऱ्यावर चढून जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून चोरटा पसर झाला.

ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाली आहे. या प्रकरणी चोराविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.दोन चोरट्यांनी कामोठे येथील अजिंक्यतारा सोसायटीमध्ये प्रवेश केला. त्यावेळेस सोसायटीतील रहिवासी तेजल मोरे या सामानाची खरेदी करण्यासाठी खाली आल्या होत्या.

आपले सामान खरेदी केल्यानंतर तेजल मोरे या घरी येण्यासाठी निघाल्या. सोसायटीच्या आवारात आल्यानंतर त्यासोसायटीच्या पायऱ्या चढत असताना चोराने मागून येऊन त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र जबरीने हिसकावले आणि तो तेथून पळून गेला.

या प्रकारामुळे सोसायटीतील नागरिक भयभीत झाले आहेत. पोलीस ठाण्याजवळच ही घटना घडल्याने नागरिकांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत.

## संपादकीय


# श्रद्धास्थानांविषयी राजकारण नको

लोकशाहीत प्रश्न कुणीही विचारू शकते. प्रश्न विचारण्याचा अधिकार लोकशाही व्यवस्थेत प्रत्येकाला आहे. परंतु आरोप करताना मात्र जबाबदारी आणि पुराव्यांची जोड असणे आवश्यक ठरते.

**राम मंदिराचा विषय भारतीय जनमानसाशी अत्यंत संवेदनशीलतेने जोडलेला आहे. त्यामुळे या विषयाचा वापर कुणी राजकीय लाभासाठी केल्यास समाजात अनावश्यक संभ्रम निर्माण होऊ शकतो. अयोध्येतील श्रीराम मंदिर हे केवळ एक धार्मिक स्थळ नाही, तर भारतीयांच्या अनेक पिढ्यांच्या श्रद्धा, संघर्ष आणि सांस्कृतिक अस्मितेचे प्रतीक आहे. देशभरातील कोट्यवधी रामभक्तांनी स्वेच्छेने दिलेल्या देणग्यांमधून उभारले गेलेले हे मंदिर आज राष्ट्रीय अभिमानाचे केंद्र बनले आहे. अशा परिस्थितीत मंदिराला मिळालेल्या देणग्यांबाबत उपस्थित होत असलेल्या वादांकडे वस्तुनिष्ठपणे पाहण्याची आवश्यकता आहे. या कथित देणगी अपहार प्रकरणी पंतप्रधान कार्यालयाने जिल्हा प्रशासनाकडून माहिती मागवली आहे. उत्तर प्रदेश सरकारच्या एसआयटीकडून चौकशीही करण्यात आली आहे. ही चौकशी सुरु असल्यामुळे मंदिर ट्रस्टने जिल्हा प्रशासनाला माहिती देण्यास नकार दिला होता. परंतु एसआयटीने मंगळवारी आपला चौकशी अहवाल उत्तर प्रदेश सरकारला सादर केला असून त्याआधारे गुरूवारी काही जणांविरुद्ध एफआयआर दाखल होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. राम मंदिरासाठी निधी संकलनाची प्रक्रिया देशातील सर्वात मोठ्या जनसहभागी उपक्रमांपैकी एक होती. लाखो स्वयंसेवकांनी घराघरांत जाऊन निधी संकलन केले आणि समाजातील सर्व स्तरांतील लोकांनी आपल्या श्रद्धेनुसार योगदान दिले. त्यामुळे या निधीबाबत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांची अपेक्षा असणे स्वाभाविकच आहे. परंतु त्याचवेळी कोणतेही ठोस पुरावे समोर येण्यापूर्वी संशयाचे वातावरण निर्माण करणे किंवा राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या माध्यमातून प्रश्नचिन्ह उपस्थित करणे योग्य ठरणार नाही. श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्ट ही मंदिराच्या उभारणीसाठी आणि व्यवस्थापनासाठी स्थापन करण्यात आलेली अधिकृत संस्था आहे. ट्रस्टकडून वेळोवेळी आर्थिक व्यवहार, बांधकामाची प्रगती आणि विविध प्रकल्पांची माहिती सार्वजनिक करण्यात आली आहे. मोठ्या प्रमाणावर निधी आणि व्यापक प्रकल्प असलेल्या कोणत्याही संस्थेबाबत प्रश्न उपस्थित होऊ शकतात, परंतु त्यांची उत्तरे कायदेशीर आणि संस्थात्मक प्रक्रियांमधूनच शोधली गेली पाहिजेत. काही राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांकडून करण्यात येणारे आरोप हे अनेकदा तथ्यांपेक्षा राजकीय हेतूंनी प्रेरित असल्याचे दिसून येते. केंद्र सरकारने राम मंदिराच्या उभारणीच्या प्रक्रियेत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा सन्मान राखत आवश्यक प्रशासकीय सहकार्य केले. मंदिराच्या बांधकामात श्रद्धाळूंच्या देणग्यांवर भर देण्यात आला. त्यामुळे हा प्रकल्प लोकसहभागातून साकार झालेल्या राष्ट्रीय उपक्रमाचे उदाहरण ठरला आहे. अशा उपक्रमांबाबत जनतेचा विश्वास टिकवून ठेवणे हे सर्व संबंधित घटकांचे कर्तव्य आहे. त्यामुळेच आज गरज आहे ती वाद निर्माण करण्याऐवजी तथ्यांवर आधारित चर्चेची. कोणत्याही प्रकारच्या आर्थिक अनियमिततेचे ठोस पुरावे असतील, तर त्यांची चौकशी संबंधित यंत्रणांकडूनच व्हायला हवी. परंतु राजकीय विधानांच्या आधारे राम मंदिरासारख्या राष्ट्रीय श्रद्धास्थानाला वादाच्या भोवऱ्यात ओढणे टाळले पाहिजे. राम मंदिर हे भारतीय संस्कृतीच्या पुनर्जागरणाचे प्रतीक आहे. श्रद्धा आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या या केंद्राकडे राजकीय चष्म्यातून पाहण्याऐवजी त्याच्या व्यापक सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्वाचा विचार करणे आवश्यक आहे. पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांच्यासोबतच श्रद्धेचा सन्मान राखणे हीच या वादाकडे पाहण्याची संतुलित आणि योग्य भूमिका ठरेल.**

# पंतप्रधान मोदींच्या जनकल्याणकारी वाटचालीची तपपूर्ती

**पंतप्रधान नरेंद्र मोदी व त्यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने यशस्वीपणे १२ वर्षांचा प्रवास पूर्ण केला आहे. या कालावधीत देशाची विविध क्षेत्रांमध्ये प्रगती झाली तसेच सामान्य माणसाचे जीवनमान उंचावण्यासही मदत झाली. सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास या मूलमंत्रातून सारे परिवर्तन घडले आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल येथील सुखम हॉस्पिटलचे डॉ. संतोष जाधव यांनी मोदी सरकारच्या तपपूर्तीनिमित्त घेतलेला हा विशेष आढावा...**



प्रथमतः देशाचे लोकमान्य पंतप्रधान नरेंद्र मोदीसाहेबांना तपपूर्तीच्या अनंत कोटी शुभेच्छा! मी एक डॉक्टर आहे, ज्या प्रोफेशनला नोबेल प्रोफेशन मानले जाते, परंतु माझ्या मते जे काम प्रामाणिक हेतूने केले जाते ते नोबेल असावे. पंतप्रधानांचे कार्य पाहून हेदेखील नोबेल प्रोफेशन आहे, असा विश्वास वाटतो.

मी डॉक्टर आहे, त्यामुळे प्रथम त्याविषयी... पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात महात्मा फुले जनआरोग्य योजनेची अंमलबजावणी अतिशय सुनियोजितरित्या केली गेली अणि त्यात जवळजवळ १००० प्रकारचे आजार समाविष्ट करण्यात आले. त्यामुळे प्रत्येक कुटुंबाला त्याचा फायदा झाला. २०१४पूर्वी केवळ मोजकेच आजार आणि तेही केवळ दारिद्र्यरेषेखालील लोकांना याचा फायदा होता. आता मात्र अगदी पांढऱ्या कार्डधारकांनाही त्याचा फायदा आहे. हा टॅक्स भरणाऱ्या प्रत्येकाचा सन्मान आहे.

प्रधानमंत्री आरोग्य योजना अणि मुख्यमंत्री सहाय्यता निधीमुळे अनेक कुटुंबांना अतिमहाग उपचार जसे कॅन्सर व ऑर्गन ट्रान्सप्लांटमध्ये २.५ लाख रुपये मिळाल्याचे मी स्वतः पाहिले आहे, ज्यामुळे गरीब माणूसदेखील महागड्या आजारांवर उपचार करून आनंदाने जीवन जगत आहे. २०१७ साली हार्ट अटॅकमध्ये लागणाऱ्या स्टेंटची किंमत एका रात्रीत ८०% कपात करून पंतप्रधान मोदींनी प्रत्येक कुटुंबास मदत केली आणि प्रत्येकाच्या कुटुंबात स्वतःचे स्थान सिद्ध केले. कोरोना महामारीमध्ये तर भारताचे नियोजन अतिशय उत्तम होते. एका हाकेवर अख्खा १४० कोटी लोकांचा देश लॉकडाऊन झाला, हे कोणा येड्या गबाळ्याचे काम नाही. ऑक्सिजन, रेमडेसिव्हर आणि त्यानंतर कोविड लसीच्या वितरणामुळे आपला देश वाचला. नाहीतर जे तुम्ही पाहिले त्याच्या २००-३०० पट भयावह परिस्थिती असती. ही काळ्या दगडावरची पांढरी न पुसणारी रेष आहे

देशात रस्त्यांच्या सुधारणेमुळे अनेक दुर्लक्षित ठिकाणी आरोग्य सेवा पोहचणे सोपे झाले. माझा स्वतःचा पनवेल ते कर्जत प्रवास २९ मिनिटांत होऊ लागला. म्हणून मी कर्जतला अद्यावत आयसीयू चालू केला आणि या तालुक्यात सगळ्यात जास्त आदिवासी पाडे आहेत अश्या ठिकाणी क्रिटीकल केअर पोहचण्याचा प्रयत्न केला, ज्याचा समाजाला उपयोग झाला डिजिटल प्रगतीमुळे डिस्टंट ट्रीटमेंट सोपी झाली. थाळी वाजवून काय नसेल झाले तरी आम्हा डॉक्टर आणि स्टाफचा आत्मविश्वास नक्कीच वाढला तसेच पंतप्रधान मोदींसारखा माणूस आपल्याला प्रोत्साहित करतोय याचा अभिमान वाटला.

अखेर कोविड काळ संपला, पण त्यानंतरही प्रतेक तालुक्याच्या ठिकाणी मोठ मोठाली हॉस्पिटल होताना मी पाहिले. अनेक गावांचे टीबीमुक्त अभियान आणि त्यासाठी घेतली जाणारी मेहनत व खर्चही पाहिला. अख्ख्या गावच्या लोकांचा चेस्ट एक्सरे करताना मी पाहिला. आयुषमान भारत योजना ज्यात प्रत्येक रुग्णाची माहिती ठेवली जाईल, त्याने लोकांना देशात कुठेही उपचार घेणे सोपे होईल. 'एनएबीएच'मुळे देशातील छोट्या छोट्या हॉस्पिटल्चा मानक उंचावला.

लोक म्हणतात, मी सायन्सबरोबर आहे, पण मोदीसाहेबांनी देशाला सायन्सबरोबर धर्माचे महत्त्व शिकवले, कारण सायन्स तुम्हाला शिकवते स्त्री अणि पुरुष, पण धर्म शिकवतो आई, बहीण, पत्नी म्हणजे काय. देशाला प्रगतिपथावर घेऊन जात असताना, नव्हे नव्हे चंद्र, मंगळावर घेऊन जात असताना धर्माची जाण करून देणाऱ्या या योगी पुरुषाला शतशः नमन!

मोदीसाहेब पंतप्रधान झाले तेव्हापासून मी माझ्या गावात झालेले बदल डोळ्याने पाहिले. स्वयंपाकाला लाकूड तोडून आणणारी कुटुंब आता एलपीजी गॅस वापरू लागली. रात्री अंधारात नखं काढू नये या अंधश्रद्धेत मोठी झालेली मुले आता त्याच गावात रात्री इमर्जन्सी सर्जरी करू लागली. घरकुलामुळे लाखो लोकांना स्वतःची घरे मिळाली. गावे हागणदारीमुक्त झाली. पीक विमा अणि कर्ज आणि इतर योजनांचा गावातील प्रत्येक नागरिक फायदा घेऊ लागला आणि गावोगावी जेथे ४०-५०% जमीन शेत-लागवडीसाठी असायची, त्यात वाढ होऊन ती ८०-९०%पर्यंत पोहोचली अणि खऱ्या अर्थाने हरित क्रांती झाली.

तलावांचे गाव म्हणून ओळखले जाणाऱ्या आमच्या पनवेलमध्ये मोदीजींच्या लीडरशिपखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार मेहनत घेऊन आमदार प्रशांत ठाकूर यांनी नगरपालिकेचे रूपांतर महानगरपालिकेत केले आणि तळ्यांचे गाव विविध सोयीसुविधांनी कॉस्मॉपोलिटन शहरात बदलल्याचे मी अनुभवले.

मोदीजींच्या काळात अनेक अडचणी आल्या, पण देशाचे प्रतिनिधित्व करणारा हा लीडर डगमगला नाही. मग आपण भारतीय तर खूप चिवट आहोत. त्यांचे स्वप्न म्हणजे आपले स्वप्न.. या देशाला जगाची महासत्ता बनवायचेच आहे.


आतादेखील युद्धाच्या काळात आपल्या देशातील प्रत्येक नागरिक व्यवस्थित आयुष्य जगत आहे, ते पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दूरदर्शी व मुत्सद्दी धोरणामुळे हे एक अटळ सत्य आहे. त्यामुळे या योगी पुरुषाला पुन्हा एकदा नमन! लोकमान्य पंतप्रधान मोदीजींची वाटचाल अशीच यशस्वी आणि देशाची आणखी प्रगती होऊदे!

(लेखक एमडी मेडिसीन आणि क्रिटीकल केअर स्पेशलिस्ट आहेत.)

# रयतेचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज

महाराष्ट्रातील करवीर तथा कोल्हापूर येथील छत्रपती, थोर समाजसुधारक, प्राथमिक शिक्षण, जातिभेद-निवारण, अस्पृश्यता-निवारण इ. सुधारणांचे पुरस्कर्ते राजर्षी शाहू महाराज यांची आज जयंती...

शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागलच्या जहागीरदार घाटगे घराण्यात जयसिंगराव आणि राधाबाई या दाम्पत्याच्या पोटी झाला. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव यशवंतराव. राजकोट व धारवाड येथे त्यांचे शिक्षण झाले. विद्यार्थीदशेत त्यांनी इंग्रजी, संस्कृत, इतिहास, राज्यशास्त्र इ. विषयांचा अभ्यास केला. त्यांना राज्याधिकार (२ एप्रिल १८९४) प्राप्त झाला. तत्पूर्वी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या



लक्ष्मीबाई या कन्येबरोबर त्यांचा विवाह झाला (१८९१). त्यांना राजाराम व शिवाजी हे दोन मुलगे आणि राधाबाई (आक्कासाहेब) व आऊबाई या दोन कन्या झाल्या.

शाहू महाराजांनी प्रशासन-यंत्रणेनची पुनर्ररचना करून भास्करराव जाधव, दाजीराव विचारे, आ. ब. लठ्ठे यांसारख्या बहुजन समाजातील कर्तबगार व गुणी व्यक्तींना अधिकारावर नेमण्यास सुरुवात केली. १८९७-९८ साली प्रथम दुष्काळ व नंतर प्लेग अशी संकटे कोसळली. तरुण शाहूंनी धैर्याने त्यांवर मात केली. १९०२ साली सातव्या एडवर्डच्या राज्यारोहणानिमित्त त्यांनी युरोपचा दौरा केला. तेथील भौतिक प्रगतीचा मोठा प्रभाव त्यांच्यावर पडला त्यामुळे त्यांचे अनुभवविश्व समृद्ध झाले.

बहुजन समाज शिकून शहाणा झाल्याशिवाय त्यांचे दारिद्र, अज्ञान व अंधश्रद्धा नष्ट होणार नाहीत हे जाणून शाहूंनी शिक्षणाच्या, विशेषतः प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावर भर दिला. रयतेचा राजा म्हणून त्यांची प्रतिमा जनसामान्यात निर्माण झाली. अवघ्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी ६ मे १९२२ रोजी हृदयविकाराने त्यांचे निधन झाले. (साभार : मराठी विश्वकोष)




# ११००० mAh बॅटरीसह Honor X८० Pro Max लाँच

स्मार्टफोन निर्माता कंपनी ऑनरने टेकने आपला नवीन स्मार्टफोन ऑनर एक्स८० प्रो मॅक्स बाजारात लॉन्च केला आहे. या फोनची खासियत म्हणजे यात ग्राहकांना



११ mAh क्षमतेची बॅटरी आणि १०,००० निट्स पीक ब्राइटनेस असलेला डिस्प्ले मिळतोय. हा फोन सध्या चीनी बाजारपेठेत विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आला असून लवकरच तो भारतात लाँच केला जाऊ शकतो.


हा फोन चार वेगवेगळ्या स्टोरेज व्हेरियंटमध्ये आहे. ८ जीबी रॅम + १२८ जीबी स्टोरेज असलेल्या स्मार्टफोनची किंमत १ हजार ९९९ युआन (अंदाजे २८ हजार) आहे. ८ जीबी रॅम + २५६ जीबी स्टोरेज असलेल्या स्मार्टफोनची किंमत २ हजार १९९ युआन म्हणजेच जवळपास ३१ हजार ठरवण्यात आली आहे. तर, ८ जीबी रॅम + ५१२ स्टोरेज आणि १२ जीबी रॅम + ५१२ स्टोरेज असलेल्या स्मार्टफोनची किंमत अनुक्रमे २ हजार ४९९ युआन (जवळपास ३५ हजार) आणि २ हजार ७९९ युआन (जवळपास ३९ हजार) इतकी आहे.

या स्मार्टफोनमध्ये ६.७८ इंचाचा १.५K LTPS AMOLED डिस्प्ले देण्यात आला आहे, जो १२०Hz रिफ्रेश रेटला सपोर्ट करतो. विशेष म्हणजे, यात जगातील पहिला १०,००० निट्स पीक ब्राइटनेस असलेला डिस्प्ले आहे, ज्यामुळे कडक उन्हातही स्क्रीन अगदी स्पष्ट दिसेल. डिस्प्लेच्या सुरक्षेसाठी ॲल्युमिनियम सिलिकेट मटेरियलचा वापर करण्यात आला आहे. तसेच, फोनला पाण्यापासून सुरक्षित ठेवण्यासाठी IP६८ + IP६९ + IP६९K रेटिंग देण्यात आली आहे.

फोनच्या बॅक पॅनलवर ड्युअल कॅमेरा सेटअप आहे, ज्यामध्ये ५० मेगापिक्सेलचा मुख्य OIS कॅमेरा आणि ८ मेगापिक्सेलचा सेकण्डरी कॅमेरा समाविष्ट आहे. सेल्फी आणि व्हिडिओ कॉलिंगसाठी समोरच्या बाजूला ८ मेगापिक्सेलचा कॅमेरा देण्यात आला आहे. कनेक्टिव्हिटीसाठी यात ५G, ४G, LTE, WiFi ६ आणि Bluetooth सारखे फीचर्स देण्यात आले आहेत. ऑनर एक्स८० प्रो मॅक्सचे मुख्य आकर्षण म्हणजे यात ग्राहकांना ११ हजार एमएएच क्षमतेची बॅटरी मिळत आहे. ही बॅटरी चार्ज करण्यासाठी ९०W फास्ट चार्जिंगचा सपोर्ट करते. या फोनमध्ये Qualcomm Snapdragon ६ Gen ५ चिपसेट देण्यात आला आहे. हा फोन लेटेस्ट Android १६वर काम करतो.

# प्रतिभावंत लेखक व.पु. काळे

वसंत पुरुषोत्तम उर्फ व.पु. काळे हे मराठी भाषेतील लेखक, कादंबरीकार, कथाकथनकार होते. त्यांचा जन्म २५ मार्च १९३२ रोजी झाला. त्यांचे विचार साहित्य रसिकांमध्ये खूप प्रसिद्ध आहेत. हसता हसता डोळ्यात पाणी आणणारा असा त्यांचा विनोद असे. विशेषतः तरुणाईच्या मनावर वपुंनी आपल्या लेखनाच्या माध्यमातून गारूड केले होते. जगणे हीसुद्धा एक कला आहे, ती आपण अवगत करायला हवी, असा संदेश ते अगदी सहज देऊन जात असत. व.पु. या दोन शब्दावर तमाम रसिक अजूनही प्रेम करत आहेत. त्यांचे विचार आदानप्रदान करत आहेत.



## निमित्त

व.पु. मुंबई महानगरपालिकेत होते. पेशाने वास्तुविशारद होते, पण वास्तू साकारताना त्यांनी किती सुंदर सुंदर पुस्तके आपल्या मराठी मातृभाषेत लिहिली याला तोड नाही. वपुंचे मराठी लिखाण सामान्य माणसाच्या जीवनाला भिडणारे, समृद्ध करणारे आहे. आपण सारे, अर्जुन, गुलमोहर, गोष्ट हातातली होती, घर हरवलेली माणसं, दोस्त, माझ्या माझ्यापाशी, मी माणूस शोधतोय, वन फोर द रोड, रंग मनाचे, माणूस, वपुर्झा, हुंकार असे पत्रसंग्रह, ललितप्रकार खूपच प्रसिद्ध आहेत तसेच तप्तपदी ठिकरी व वाट एकटीची यासारख्या कादंबऱ्या खूपच गाजल्या.


वपुंनी ६०पेक्षा जास्त पुस्तकांचे लिखाण केले. त्यातील पार्टनर, वपूर्झा, ही वाट एकटीची यांचे कथाकथन त्यांनी स्वतः केलं. या कथाकथनाला प्रेक्षकांनी भरपूर दाद दिली आणि ऑडिओ कॅसेटमधून घराघरात पोहोचणारे वपु पहिले लेखक ठरले. पेशाने आर्किटेक्ट असणारे वपु इमारतींच्या आराखड्याचे रेखन करण्यापेक्षा लेखन करू लागले आणि मराठी साहित्याला एक थोर साहित्यिक लाभला.

वपुंचं लिखाण चौफेर होतं. कथा, ललित, नाटक, वैचारिक, चरित्र, आत्मचरित्र असे सर्व लेखन प्रकार त्यांनी हाताळले. त्यांच्या कथा जिवंत माणसांच्या, नातेसंबंधांच्या, स्वैर वेड्या मनाचे विविध कंगोरे अधोरेखित करणाऱ्या असत.

पेशाने आर्किटेक्ट असणाऱ्या 'वपुं'नी कथा आणि कादंबरी लेखन तर केलंच पण आकाशवाणी आणि दूरदर्शनसुद्धा आपल्या छोट्या छोट्या प्रहसनांनी गाजवलं. श्रोत्यांवर गारूड घालणारं कथाकथन म्हणजे तर त्यांचा हातखंडा पैलू! त्यांनी आपल्या खास शैलीत १५००हून अधिक कथाकथनाचे कार्यक्रम करत आपलं लेखन गावोगावी तर पोहोचवलंच, पण त्यांच्या कथाकथनाच्या ऑडियो कॅसेट्समुळे ते अक्षरशः घराघरात जाऊन पोहचले होते. त्यांच्या कथांवर एकांकिका, नाटकं आणि सिनेमे निघाले होते. वपु स्वतःही उत्तम अभिनेते होते.

वपु याचं लेखन हे मराठी मध्यमवर्गीय, पांढरपेशी भावविश्वाभोवती फिरत असलं तरी त्यांची तत्त्वज्ञानप्रचुर, हलकीफुलकी, सोप्पी सुभाषितवजा वाक्यं समाजातल्या सर्वच स्तरातल्या लोकांवर विलक्षण मोहिनी टाकणारी असत. अशा या प्रतिभावंत लेखकाचे २६ जून २००१ रोजी निधन झाले. आजही त्यांची पुस्तके आवर्जून वाचली जातात. त्यांच्या बहुसंख्य पुस्तकांमधल्या चमकदार आणि सुभाषितवजा वाक्यांचा संग्रह 'वपुर्झा' या नावाने प्रसिद्ध आहे. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# पावसाळ्यात पायांना चिखल्या होऊ नये म्हणून 'हे' करा

पावसाळा सुरू झाला की अनेकांना एक सामान्य पण त्रासदायक समस्या जाणवते. सतत ओले होणारे पाय, चिखल, पावसाचे पाणी आणि घर्षण यामुळे चपला किंवा सँडल पायाला लागतात. परिणामी पायावर फोड येतात, त्वचा सोलली जाते आणि काही वेळा लहान जखमाही होतात. सुरुवातीला हा त्रास किरकोळ वाटत असला तरी दुर्लक्ष केल्यास वेदना वाढू शकतात आणि संसर्ग होण्याची शक्यतादेखील निर्माण होते.



पावसाळ्यात पाय सतत ओले राहिल्यामुळे त्वचा मऊ पडते. अशा वेळी चपला किंवा सँडलचा पट्टा त्वचेवर घासत राहिल्यास फोड येण्याची शक्यता वाढते. विशेषतः नवीन चपला वापरत असाल तर हा त्रास अधिक जाणवू शकतो. त्यामुळे पावसाळ्यात चपला चांगल्या निवडा. पायाला अगदी घट्ट किंवा खूप सैल चपल घालणे टाळावे. घट्ट चपला त्वचेवर दाब निर्माण करते, तर सैल चपल चालताना सतत घासली जाते. दोन्ही परिस्थितीत फोड येऊ शकतात. त्यामुळे पायाला आरामदायक आणि योग्य मापाची चपल निवडणे महत्त्वाचे आहे. पावसाळी वेगळ्या चपला मिळतात. त्याच वापरा.


पावसात भिजून आल्यानंतर पाय शक्य तितक्या लवकर स्वच्छ धुवून कोरडे करावेत. बाहेरुन आल्यावर फक्त पाय पुसू नका. ते स्वच्छ पाण्याने धुवा. अनेकदा लोक ओल्या पायांनीच बराच वेळ राहतात. त्यामुळे त्वचा अधिक नाजूक होते आणि घर्षणामुळे जखम होण्याचा धोका वाढतो. पायाच्या बोटांमधील भागही व्यवस्थित कोरडा करणे गरजेचे आहे. ऑफिसला पोहचल्यावरही पाय धुवा. कुठेही जाताना पाय धुवाच.

ज्या ठिकाणी चपला वारंवार लागते त्या भागावर पेट्रोलियम जेली किंवा मॉइश्चरायझरचा हलका थर लावल्यास घर्षण कमी होण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे त्वचा आणि चपला यांच्यातील थेट संपर्क कमी होतो. पावसाळ्यात शक्यतो मऊ आणि लवचिक पट्टे असलेल्या चपलांचा वापर करावा. कडक प्लास्टिक किंवा खडबडीत पट्टे असलेल्या चपलांमुळे त्वचेवर अधिक घर्षण होते. त्यामुळे पायाला आरामदायक वाटतील अशी पादत्राणे निवडणे योग्य ठरते. मऊ गादी असलेल्या चपला वापरा.

जर पायावर फोड येण्यास सुरुवात झाली असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. फोड फोडण्याचा प्रयत्न करू नये. तो भाग स्वच्छ ठेवावा आणि आवश्यक असल्यास बँडेज लावावे. जखम झाल्यास ती कोरडी आणि स्वच्छ ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. लालसरपणा, सूज किंवा पू दिसल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# देशी दारू दुकानाविरोधात खोपोलीतील रहिवासी आक्रमक

**खोपोली : प्रतिनिधी**




खोपोली रेल्वे स्थानकाच्या हाकेच्या अंतरावर असणाऱ्या अरिहंत डी.२ या इमारतीच्या तळमजल्यावर राजश्री देशी दारू दुकानाला उत्पादन शुल्क विभागाने परवानगी दिल्याने इमारत व परिसरातील नागरिकांनी या विरोधात संताप व्यक्त केला असून, जर हे दुकान बंद झाले नाही तर आंदोलन उभे करणार असल्याचे रहिवाशांकडून सांगण्यात येत आहे.

खोपोली रेल्वे स्टेशन कडे जाणाऱ्या छोट्याशा रस्त्यावर अरिहंत डी .२ ही इमारत असून या दुकानाच्या तळमजल्यावर राजश्री देशी दारू दुकान सुरू करण्यात आले असून या दुकानात तळीरामाची नेहमीच गर्दी असते, इथूनच रेल्वे स्थानकाकडे छोटा रस्ता जातो येथील मद्यपी रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या महिला वर्गाकडे वेगळ्या नजरेने पाहतात, त्यामुळे महिला वर्गात असुरक्षितेची भावना निर्माण झाली आहे, त्यामुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, या इमारतीच्या तळमजल्यावर इतर कार्यालय आहेत त्यांनाही या तळीरामाचा त्रास होत असल्याचे अनेकांनी सांगितले,वेळीच संबंधित विभागाने या दुकान वर नियमानुसार कारवाई करून दुकान अन्यत्र हलवावे अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे.

मुळातच भर वस्ती असणाऱ्या या भागात या दुकानाला उत्पादन शुल्क विभागाने परवानगी दिलीच कशी असा सवाल केला जात आहे, सदरच्या दुकानातील दारू उग्र वासाने रहिवाशांची झोप उडाली आहे. जर हे दारूचे दुकान शासनाने बंद केले नाही तर शासनाविरोधात तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा करण्याचा संकल्प येथील रहिवाशांनी केला आहे. अलीकडेच यासंबंधीचे निवेदन खालापूर तहसीलदार यांच्याकडे पाठविण्यात आल्याचे, त्याचप्रमाणे रायगड पोलीस अधीक्षक यांनाही निवेदन देण्यात आल्याचे रहिवाशांकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे उत्पादन शुल्क विभाग काय करते याकडे रहिवाशांचे लक्ष लागले आहे.

## समाजाचा विकास होण्यासाठी वाचन संस्कृती महत्त्वाची –सभापती कृष्णा पारंगे

**चौक : प्रतिनिधी**

वाचनालये ही समाजाचा बौद्धिक, शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पाया आहे, यातूनच प्रशासनात वरिष्ठ अधिकारी तयार होतात, ग्राम पंचायत तांबाटी आणि गोदरेज कंपनी यांचे समाजासाठी मोठे योगदान आहे, असे गौरव उद्गार सभापती कृष्णा पारंगे यांनी काढले आहे.




ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी यांनी गोदरेज कंपनी यांच्या मदतीने व सेवा सामाजिक विकास संस्था सातारा यांच्या माध्यमातून वातानुकूलित वाचनालय व महाराष्ट्र राज्य सेवा परीक्षा अभ्यासक्रम सुरु केला आहे, या सुसज्ज इमारतीचे उद्घाटन सभापती कृष्णा पारंगे यांच्या हस्ते करण्यात आले, त्या प्रसंगी ते बोलत होते.

संपूर्ण रायगड जिल्ह्यात असे वाचनालय नसून अशा प्रकारे वाचनालय आणि महाराष्ट्र लोक सेवा आयोग यांची स्पर्धा परीक्षा आणि मार्गदर्शन करणारी एकमेव ग्राम पंचायत आहे. या अभ्यासिकेत लहान मुले ते वयस्कर व्यक्ती आणि महिला यांच्यासाठी पुस्तके उपलब्ध असून यात वाढ करण्यात येणार असून लोकांचे, वाचकांचे सहकार्य अपेक्षित आहे.जीवनात मोठे होण्यासाठी आत्मविश्वास निर्माण होणे आवश्यक, त्यासाठी मेहनत घ्यावी अशी विनंती उपसभापती भाई शिंदे यांनी विद्यार्थी वर्गाला केली.

या वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार,जिल्हा परिषद सदस्य संतोष बैलमारे,सरपंच ग्यानेश्वर् सुतार, माजी सरपंच जितू सकपाळ, नितीन कदम,ग्रामस्थ, विद्यार्थी, पंचक्रोशीतील शिक्षणप्रेमी, गोदरेज अधिकारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सीएफआय कार्यालयात नेत्र तपासणी शिबिर

**पेण : प्रतिनिधी**



सी.एफ.आय आणि लायन्स क्लब, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमानाने दिनांक २० जून रोजी CFI कार्यालयात डोळे तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये प्रतीपालीत मुले, त्यांचे पालकआणि CFI कर्मचारी सहभागी झाले होते. आणि त्यांचा उत्तम प्रतिसाद शिबिरासाठी मिळाल्याचे पहावयास मिळाले.

डोळ्यांची तपासणी करून दृष्टीदोष ओळखणे, आवश्यक मार्गदर्शन करणे आणि गरजेनुसार औषधे उपलब्ध करून देणे हा शिबिराचा मुख्य उद्देश होता.त्या नुसार माशिनिद्वारे डोळ्यांची तपासणी केली गेली आणि योग्य मार्गदर्शन आणि आवश्यक तेनुसार मलम आणि ड्रॉप दिली गेली. नेत्र तपासणी शिबिरामुळे डोळ्यांची तपासणी वेळेत होऊ शकली. अनेक लाभार्थ्यांमध्ये दृष्टीदोष ओळखून त्यांना चष्मा वापरण्याबाबत योग्य मार्गदर्शन करण्यात आले. काहींना नवीन चष्म्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले, तर गंभीर समस्या असलेल्या लाभार्थ्यांना पुढील उपचारासाठी रुग्णालयात पाठविण्यात आले.

या शिबिरामुळे डोळ्यांच्या आरोग्याबाबत लोकांच्यात जनजागृती निर्माण झाली.

## ‘आत्मा’ अंतर्गत शेततळ्यातील मत्स्यसंवर्धन व प्रक्षेत्र भेट प्रशिक्षण

### शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**धाटाव : प्रतिनिधी**

कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत "किसान गोष्टी व प्रक्षेत्र भेट" तसेच "शेततळ्यातील मत्स्यसंवर्धन" या विषयावरील एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन आज कृषी विज्ञान केंद्र, रोहा येथे करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमास रोहा, माणगाव व तळा तालुक्यातील सुमारे ७५ शेतकरी बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.




कार्यक्रमाच्या प्रारंभी कृषी विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. तलाठी सर यांनी उपस्थित शेतकऱ्यांचे स्वागत करून कार्यक्रमाची प्रस्तावना मांडली. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर एल निनो (El Nio) परिस्थितीचा शेतीवर होणारा परिणाम, त्यासाठी आवश्यक असलेले नियोजन, खरीप हंगामातील पीक व्यवस्थापन, पीक बचाव अभियान, तसेच खतांचा संतुलित वापर याविषयी सविस्तर माहिती दिली. रासायनिक खतांचा अतिरेकी वापर टाळून मृदा परीक्षणावर आधारित खत व्यवस्थापन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सेंद्रिय खतांचा वापर वाढवून जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्याचे आवाहन केले.

यानंतर कृषी विज्ञान केंद्रातील मत्स्य तज्ज्ञ श्री. माधव गीते यांनी शेततळ्यातील मत्स्यसंवर्धन या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी शेततळ्यासाठी योग्य जागेची निवड, पाण्याची उपलब्धता, पाण्याचा pH, मत्स्यपालनासाठी उपयुक्त माशांच्या जाती, मत्स्यबीजांची निवड, खाद्य व्यवस्थापन, मत्स्य उत्पादन वाढविण्याच्या तंत्रज्ञानाचा वापर तसेच माशांमध्ये आढळणारे विविध रोग व त्यांचे नियंत्रण याबाबत सविस्तर माहिती दिली. शेततळ्यात मत्स्यपालन हा शेतीला पूरक व अतिरिक्त उत्पन्न देणारा व्यवसाय असून शेतकऱ्यांनी त्याचा अवलंब करावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रशिक्षणादरम्यान उपस्थित शेतकऱ्यांनी मत्स्यपालन, पीक व्यवस्थापन, हवामान बदल आणि शेतीतील नव्या तंत्रज्ञानासंदर्भात विविध प्रश्न उपस्थित केले. संबंधित तज्ज्ञांनी शेतकऱ्यांच्या शंकांचे समाधान करून त्यांना व्यावहारिक मार्गदर्शन केले.

त्यानंतर कृषी विज्ञान केंद्र परिसरात प्रक्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले. यावेळी विविध प्रात्यक्षिक प्लॉट, सुधारित पीक तंत्रज्ञान, फळबाग व्यवस्थापन, सेंद्रिय शेती, जलसंधारण उपाययोजना आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिके पाहून कृषी तज्ज्ञांशी संवाद साधला व विविध तांत्रिक बाबींची माहिती घेतली.

या कार्यक्रमास आत्मा, रोहा येथील तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक श्री. परमेश्वर गाडे, सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक प्रमोद शिंदे ,सचिन लोखंडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषी विज्ञान केंद्र व आत्मा यंत्रणेच्या अधिकारी–कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

या प्रशिक्षणामुळे शेतकऱ्यांना शेततळ्यातील मत्स्यसंवर्धन, हवामान बदलाशी जुळवून घेणाऱ्या शेती पद्धती आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची उपयुक्त माहिती मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचा समारोप शेतकऱ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात करण्यात आला.

# जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना नोकरीची सुवर्णसंधी!

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,रायगड–अलिबाग कार्यालयातर्फे दि.३० जून २०२६ रोजी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,रायगड–अलिबाग वैभव निवास, भंडार आळी,चेंढरे, अलिबाग येथे जागेवर निवड संधी /Placement Drive आयोजित करण्यात आले असून जास्तीत जास्त बेरोजगार उमेदवारांनी या जागेवर निवड संधी /Placement Drive चा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मागदर्शन केंद्र, रायगड–अलिबागचे प्र.सहायक आयुक्त श्रीकांत कोकाटे यांनी केले आहे.

जिल्ह्यातील नामांकीत आस्थापनांकडील विविध रिक्तपदांच्या/अॅप्रेंटिसशिपची भरतीसाठी जागेवर निवड संधी / Placement Drive आयोजित केला आहे. या जागेवर निवड संधी /Placement Drive मध्ये नोकरी इच्छूक उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे निवड केली जाणार आहे. या विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी केलेल्या उमेदवारांना ऑनलाईन पध्दीतीने अर्ज करता येईल.

प्रथम https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेत स्थळावरील Employment- Job Seeker (Find A Job)- Job Seeker Login या क्रमाने जाऊन आपल्या कडील युजर आयडी व पासवर्ड वापरुन आपली शैक्षणिक माहीती अद्ययावत करून त्यातील Pandit Dindayal Upadhyay Job Fair या ऑप्शनमधून आपला जिल्हा निवडून जिल्ह्याच्या नावावरील Vacancy Listing-I Agree व दिसणाऱ्या विविध पदांना आपल्या शैक्षणिक अर्हते प्रमाणे ऑनलाईन अप्लाय करावे.

जागेवर निवड संधी/Placement Drive मध्ये सहभागी होणाऱ्या नवउद्योजकांकरिता महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या कर्ज योजनां विषयाची माहिती दिली जाईल. तसेच जिल्ह्यातील कार्यरत महामंडळ जागेवर निवड संधी /Placement Drive मध्ये आपल्या विविध कर्ज योजनासह सहभागी होत आहेत. आपल्याला कर्ज योजनेबद्दल माहिती व मार्गदर्शन याद्वारे दिले जाईल. जेणे करून स्वयंरोजगार करणाऱ्या इच्छूक उमेदवारांना योजनेचा लाभ मिळू शकेल. जिल्ह्यात राबविले जाणारे मोफत कौशल्य प्रशिक्षणाची माहिती व जागेवर निवड संधी/ Placement Drive मध्ये केले जाणार आहे. तसेच जागेवर निवड संधी /Placement Drive मधील रिक्तपदांची माहिती https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

संकेतस्थळावर ऑनलाईन अप्लाय करताना काही समस्या असल्यास या कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२१४१–२२२०२९ या भ्रमध्वनीवर संपर्क साधावा.

## रोटरी क्लब ऑफ रोहाच्या अध्यक्षपदी दिनेश जैन

**धाटाव : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ रोहा यांच्या नवीन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान सोहळा ज्येष्ठ नागरिक सभागृह, रोहा येथे संपन्न झाला. यावेळी दिनेश जैन यांनी अध्यक्षपदी, आशिष दळवी यांची सचिवपदी तर अशोक पार्टे यांनी खजिनदारपदी निवड करण्यात आली. यावेळी नवीन कार्यकारिणीतील इतर पदाधिकाऱ्यांनीही पदग्रहण केले.

या सोहळ्यासाठी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर इलेक्ट नितीन ढमाले पुणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. असिस्टंट गव्हर्नर इलेक्ट मधुबाला निकम पेण यांची विशेष उपस्थिती लाभली. या सोहळ्यात विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या रोह्यातील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये रोहा अष्टमी नगर परिषदेच्या अध्यक्षा कुमारी वनश्री शेडगे, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रोहा कार्याध्यक्ष समीर शेडगे, इस्रो भेटीसाठी निवड झालेली कुमारी विहान अजित तेलंगे, ज्येष्ठ गडदुर्ग अभ्यासक सुखद राणे, वाचनालयाचे अध्यक्ष किशोर तवाडे, पत्रकार राजेंद्र जाधव, सागर जैन, विश्वजीत लुमन व उद्धव आव्हाड, जैन संघाचे अध्यक्ष दिलीप सोलंकी आदींचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष राजेंद्र पोकळे, सचिव जयदेव पवार, खजिनदार भूषण लुमन, सुखद राणे आदींनी परिश्रम घेतले,

## बोरवाडी केंद्रातील विद्यार्थ्यांना बेटर सोसायटी फाउंडेशनमार्फत मोफत वह्यावाटप

**माणगाव : प्रतिनिधी**



शैक्षणिक वर्ष २०२६–२७ नुकतेच सुरु झाले असून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी समाजातील विविध संस्था,संघटना शैक्षणिक साहित्यांचे मोफत वाटप करीत आहेत. या सेवाभावी संस्थांपैकीच एक ओळखली जाणारी माणगाव तालुक्यातील गांगवली – खारबाचीवाडी येथील बेटर सोसायटी फाउंडेशनमार्फत तालुक्यातील बोरवाडी केंद्रातील चाच,बोरवाडी,घोडशेतवाडी,धामणी,कुंभे या पाच शाळांतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम गुरुवार दि.२५ जून २०२६ रोजी तालुक्यातील बोरवाडी केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत व हस्ते राजिप केंद्र शाळा बोरवाडी येथे उत्साहात संपन्न झाला. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांचे बोरवाडी केंद्रातील शिक्षकांतर्फे स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना बोरवाडी केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे म्हणाले कि,बेटर सोसायटी फाउंडेशन गांगवली – खारबाचीवाडी हि शैक्षणिक,सामाजिक क्षेत्रात काम करीत असून या फाउंडेशनने अल्पावधीत आपल्या या उपक्रमामुळे रायगड जिल्ह्यात नावलौकिक कमाविले आहे. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे हा उद्देश नजरेसमोर ठेऊन हे फाउंडेशन सामाजिक जीवनात काम करीत असून या फाउंडेशनचे उपक्रम हे अतिशय स्तुत्य असून या फाऊंडेशनला पुढील वाटचालीस त्यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. बेटर सोसायटी फाउंडेशनचे कार्याध्यक्ष अनिल वनगुले यांनी आपल्या मार्गदर्शनात बोलताना सांगितले कि,या फाउंडेशनच्या संस्थापिका अध्यक्षा मंजुषा गोतकर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली फाउंडेशनची आम्ही सारी मंडळी काम करीत आहोत. बहुजन समाजतील गोरगरीब,गरजू विद्यार्थ्यांना,नागरिकांना काही मदतीचा हात मिळावा यासाठी आमचे फाउंडेशन नेहमीच प्रयत्नशील असते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आमचे फाउंडेशन काम करीत आहे. आजच्या वह्या वाटप कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे या दृष्टीकोनातून आम्ही हे वह्या वाटप करीत आहोत.

## कशेडी बंगला येथील स्वामी समर्थ मठात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**पोलादपूर : प्रतिनिधी**

झोपेत स्वप्न स्वप्नंच असतात, अशी स्वप्न पाहू नका, जीवनात नेहमी मोठी स्वप्न पहा आणि ती सत्यात उतरवा, मिसाईल मॅन व भारताचे दिवंगत राष्ट्रपती डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम हे सुद्धा ग्रामीण भागातून शिक्षण घेऊन मोठे झाले. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवा, असे मार्गदर्शन मठाचे व्यवस्थापक समीर मोरे यांनी विद्यार्थ्यांना केले. श्री स्वामी समर्थ उपासक मंडळ दादर या कशेडी बंगला येथील श्री स्वामी समर्थ मठात अवसारी शेठ चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई यांच्या वतीने विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी मठाचे व्यवस्थापक समीर मोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

अवसारी शेठ चॅरिटेबल ट्रस्ट मुंबईने ग्रामीण गोरगरीब सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य देताना मदतीचा हात देऊन सामाजिक बांधिलकीतून अन्न, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात काम करीत करीत ज्ञानदानासारख्या पवित्र कार्याला मदत केल्याचे केंद्रप्रमुख प्रभाकर कोळेकर यांनी सांगितले.

यावेळी व्यासपीठावर ट्रस्टचे अध्यक्ष ललित भाई शेठ, ट्रस्टी मुकुंद देशमुख, निकिता मॅडम, संजय मोरे, केंद्र प्रमुख सुदाम राणे, विद्यार्थी ग्रामस्थ व स्वामीभक्त उपस्थित होते.





**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E–TENDER NOTICE (THIRD CALL)**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:- EE/EHV (O&M)/DIVN/MHD/ Tech/E-Tender-13/ III[rd] Call / 2026-27 Dtd.23.06.2026 RFx No. 7000040064** | **Sub:-** Third Call for SRM E-Tender for providing Closing and Tripping Coil for various makes of CB at 220 kV Kandalgaon Ss, 220 kV Vilebhagad Ss,100 kV Roha and 100 kV Mhasala Substation under EHV (O&M) Division Mahad. | **Rs. 4,85,496/- (Including GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST. Bid submission is from **26.06.2026 @ 00:00 hrs to 05.07.2026 @23:59 Hrs** for above tender. For further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in.**

**Contact Person:-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.8793505100

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn, Mahad**

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No.** EE/EHV(O &M)/DIVN/ MHD/ Tech/E-Tender-14/2026-27 Dtd.26.06.2026 **RFX No. 7000040510** | **Sub :-** SRM E-Tender for various regular preventative maintenance / emergency and breakdown works of various 220KV & 100KV Substations under EHV O&M Dn. Mahad for the year 2026-27. | Rs. 20,00,000/- (including GST + 1% Labour CESS) |
| 2 | **Tender No.** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/ Tech/E-Tender-15/2026-27 Dtd. 26.06.2026 **RFx No. 7000040522** | **Sub :-** SRM E-Tender for AMC of Air Conditioners at various substations under EHV (O&M) Dn. Mahad for the year 2026-27. | Rs. 7,50,000/- (including GST + 1% Labour CESS) |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.
Bid submission is from **26.06.2026 @ 00:00 hrs. to 10.07.2026 @ 23:59 Hrs.** for above tender
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in.**
**Contact Person :-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.8793505100
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn. Mahad**

# वाढवण बंदर प्रकल्पाने पार केले निर्णायक टप्पे; उभारणीच्या कामांना आता अधिक गती

**उरण : वार्ताहर**

देशातील १३वे प्रमुख बंदर असलेल्या वाढवण बंदर प्रकल्पाने आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला असून, त्यामुळे प्रकल्प क्षेत्रातील विविध कामांच्या अंमलबजावणीला अधिक गती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या संदर्भात महत्त्वपूर्ण घडामोड म्हणून, मुंबई उच्च न्यायालयाने किनारपट्टीलगतच्या भराव (क्षेत्राच्या प्रवेश मार्गात येणाऱ्या खारफुटी (मँग्रोव्ह) पट्ट्या हटविण्यास मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे प्रकल्पाच्या अंमलबजावणीसमोरील प्रमुख प्रलंबित अडथळ्यांपैकी एक अडथळा दूर झाला असून, आगामी कामांना वेगाने पुढे नेण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे प्रकल्पाच्या पुढील टप्प्यातील कामे नियोजित नियोजनानुसार राबविण्यास मदत होणार असून, वाढवण बंदराच्या उभारणीच्या प्रक्रियेला नवी गती मिळणार आहे.



या मंजुरीमुळे वाढवण बंदर प्रकल्पाच्या कामांना आता पूर्ण वेगाने पुढे नेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रकल्पातील ब्रेकवॉटर उभारणी तसेच किनारपट्टीलगतच्या भराव (नियर शोर रिक्लेमेशन) कामांशी संबंधित प्रमुख कंत्राटे यापूर्वीच प्रदान करण्यात आली आहेत. त्याचबरोबर, बाह्य दळणवळण सुविधांच्या उभारणीसाठी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि भारतीय रेल्वे यांसारख्या संस्थांनी अभियांत्रिकी व पूर्वतयारीची कामे सुरू केली आहेत. या सर्व घडामोडींमुळे प्रकल्पाच्या विविध घटकांच्या अंमलबजावणीला अधिक गती मिळणार असून, वाढवण बंदराच्या उभारणीची प्रक्रिया अधिक प्रभावीपणे पुढे सरकणार आहे.

तसेच सेवा मार्गाच्या उभारणीच्या कामांना तात्काळ गती मिळण्याची अपेक्षा असून, लवकरच या कामांना पूर्ण स्वरूपात प्रारंभ होणार आहे. दरम्यान, प्रकल्पासाठी आवश्यक जलपुरवठा यंत्रणेच्या उभारणीची कंत्राटे यापूर्वीच देण्यात आली आहेत. तसेच, तात्पुरत्या वीजपुरवठ्यासाठी आवश्यक पायाभूत व्यवस्था पूर्णत्वाच्या मार्गावर असून, त्या लवकरच कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे.

महाराष्ट्र शासन तसेच विविध राज्यस्तरीय यंत्रणांच्या सक्रिय सहकार्यामुळे भूसंपादनाची प्रक्रियादेखील वेगाने पुढे सरकत आहे. आवश्यक मंजुरी, बाह्य दळणवळण सुविधांची उभारणी, मूलभूत उपयुक्तता सेवा (युटिलिटी इन्फ्रास्ट्रक्चर) आणि भूसंपादन ही सर्व कामे समांतरपणे प्रगतीपथावर असल्याने वाढवण बंदर प्रकल्प आता पूर्ण क्षमतेने अंमलबजावणीच्या टप्प्यात प्रवेश करण्यासाठी सज्ज झाला आहे. या सर्व घडामोडींमुळे प्रकल्पाच्या उभारणीला भक्कम आधार मिळाला असून, देशातील सर्वात महत्त्वाकांक्षी बंदर प्रकल्पांपैकी एक असलेल्या वाढवण बंदराच्या विकासाला आता अधिक वेग मिळण्याची अपेक्षा आहे.

या घडामोडींविषयी माहिती देताना वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड (व्हीपीपीएल) चे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक गौरव दयाल, भा. प्र. से., यांनी सांगितले की, आवश्यक मंजुरी मिळणे आणि प्रकल्पाशी संबंधित विविध कामांमध्ये समांतरपणे होत असलेली प्रगती ही प्रकल्पासाठी नव्या पर्वाची सुरुवात आहे. मंजुरी प्रक्रिया, पायाभूत सुविधांच्या उभारणीतील प्रगती तसेच विविध भागधारकांमधील प्रभावी समन्वय यांमुळे प्रकल्पाच्या वेळेत अंमलबजावणीबाबतचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. नियोजित कालमर्यादेत प्रकल्प पूर्ण करून तो कार्यान्वित करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण वाटचाल सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या मंजुऱ्यांमुळे वाढवण बंदर प्रकल्पाच्या उभारणीला नवे बळ मिळाले असून, प्रकल्पाच्या विकासातील एका महत्त्वपूर्ण नव्या पर्वाची सुरुवात झाली आहे. वाढवण बंदराला जागतिक दर्जाच्या सागरी पायाभूत सुविधांनी सुसज्ज बंदर म्हणून विकसित करण्यासाठी तसेच भारताच्या भविष्यातील व्यापार आणि लॉजिस्टिक्स क्षेत्राच्या प्रगतीला गती देणारे महत्त्वपूर्ण केंद्र निर्माण करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणा आणि भागधारकांची वचनबद्धता यामुळे अधिक दृढ झाली.

## नेरूळ येथे झाडांच्या छटाई केलेल्या फांद्या फुटपाथवरच

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ सेक्टर ८मधील साईबाबा मुख्य चौका लगत असणाऱ्या फुटपाथवर पावसाळ्या पूर्व छटाइ केलेल्या झाडाच्या फांद्या मागील दोन दिवसापासून जैसे थे असल्याचे नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

नवी मुंबई मनपा पावसाळा पूर्व अवास्तव पसरलेल्या झाडाच्या फांद्या छाटन्याचे काम युद्धपातळीवर करीत आहे. नेरूळ सेक्टर ८ मधील साईबाबा मुख्य चौका लगत असलेल्या फुटपाथवर अवास्तव पसरलेल्या झाडाच्या फांद्या नवी मुंबई मनपा उद्यान विभागाने तोडल्या आहेत. मात्र तोडण्यात आलेल्या फांद्या मागील दोन दिवसांपासून जैसे थे आहेत.

हा चौक सकाळी आणि सायंकाळी कायम नागरिकांनी गजबजलेला असतो. फुटपाथवर असलेल्या या फांद्यामुळे नागरिकांना चालणे कठीण झाले असून सदर फांद्या त्वरित उचलण्यात याव्यात अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



# मडगाव जनशताब्दी एक्सप्रेसमधून अजगराच्या पिल्लाची सुटका



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

२४ जून रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील प्लॅटफॉर्म क्रमांक ११ वर, गाडी क्र. १२०५२ मडगाव – छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जनशताब्दी एक्सप्रेस च्या इंजिनमधून भारतीय अजगर जातीच्या एका पिल्लाची सुटका करण्यात आली.

२४ जुन रोजी गाडी क्र. १२०५२ मडगाव – छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जनशताब्दी एक्सप्रेस छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे प्लॅटफॉर्म क्र. ११ वर पहाटे ००:४५ वाजता दाखल झाल्यानंतर, श्री एन. के. पारसोया इंजिन क्र. २२९३६/एसआरसी/सीएबी२/डब्ल्यूएपी४ चे लोको पायलट यांना 'कॅब क्र. २' मध्ये अजगराचे पिल्लू दिसले. त्यांनी ही बाब त्यांचे कार्यभार स्वीकारणारे श्री ओमप्रकाश राम, लोको पायलट यांना कळवली.

याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनाही माहिती देण्यात आली आणि त्यानंतर श्री अभिषेक अशोक ठवरे मानद प्राणी कल्याण अधिकारी, महाराष्ट्र राज्य तातडीने घटनास्थळी दाखल झाले. योग्य ती खबरदारी घेऊन आणि रेल्वेच्या कामकाजात कोणताही व्यत्यय न आणता, पहाटे १:४० च्या सुमारास या अजगराच्या पिल्लाची सुरक्षितपणे सुटका करण्यात आली. नंतर त्याला त्याच्या नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले. भारतात आढळणारा 'इंडियन रॉक पायथन' हा बिनविषारी साप असून 'भारतीय वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत तो संरक्षित प्रजातीमध्ये मोडतो. अन्नसाखळीतील पर्यावरणीय समतोल राखण्यात त्याची महत्त्वाची भूमिका असते.

हा काळ अजगराची अंडी उबण्याचा आणि त्यातून पिल्ले बाहेर पडण्याचा असतो. मुंबई आणि संपूर्ण महाराष्ट्रात मान्सूनचे आगमन झाल्यामुळे, वन्यजीव अनेकदा मानवी वस्त्यांमध्ये किंवा सुरक्षित वाटणाऱ्या इतर ठिकाणी आश्रय घेतात. पावसापासून बचाव किंवा आश्रय मिळवण्याच्या उद्देशाने अजगराचे हे पिल्लू रेल्वेच्या इंजिनमध्ये शिरले असावे आणि अशा प्रकारे ते या ठिकाणापर्यंत पोहोचले असावे, असा अंदाज वर्तवला जात आहे.

अशा घटना पावसाळ्यात किंवा इतर कोणत्याही वेळी घडू शकतात. अशा परिस्थितीत नागरिकांनी घाबरून न जाता किंवा सापाला पकडण्याचा अथवा मारण्याचा प्रयत्न न करता, वन विभाग किंवा प्रशिक्षित सर्पमित्रांशी त्वरित संपर्क साधावा. वन्यजीव संरक्षण आणि मानवी सुरक्षा या दोन्ही गोष्टींची काळजी घेऊनच अशा प्रकारे सुटकेची मोहीम राबवणे आवश्यक आहे.

मध्य रेल्वे आपल्या लोकोमोटिव्ह कर्मचाऱ्यांची तत्परता आणि प्राणी कल्याण अधिकाऱ्यांनी केलेल्या वेळेवर मदतीचे कौतुक करते; ज्यामुळे रेल्वेच्या कामकाजावर कोणताही परिणाम न होता ही सुटका यशस्वीरीत्या पार पडली. ही घटना मध्य रेल्वेची सुरक्षितता, संकटकाळात त्वरित प्रतिसाद आणि वन्यजीव संरक्षणाप्रती असलेली कटिबद्धता अधोरेखित करते. पावसाळ्यात प्रवाशांनी आणि नागरिकांनी सतर्क राहावे, तसेच वन्यजीव आढळल्यास त्यांची योग्य व सुरक्षित हाताळणी सुनिश्चित करण्यासाठी रेल्वे प्रशासन किंवा वन विभागाच्या अधिकाऱ्यांना त्वरित कळवावे.

# रिटघर शाळेत शैक्षणिक साहित्य आणि छत्रीचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मैत्री हेच जीवन हा संदेश समाजाला देत सामाजिक उपक्रमात सातत्याने अग्रस्थानी असणारी पनवेलची गोल्डन ग्रुप या संस्थेच्या वतीने शैक्षणिक साहित्य आणि छत्रीचे वाटप करण्यात आले. रायगड जिल्हा परिषदेच्या रिटघर येथील शाळेमध्ये गोल्डन ग्रुप सदस्यांनी सदर वाटप केले. या कार्यक्रमाला रिटघर ग्रामपंचायतचे सरपंच सुभाष पुंडलिक भोपी यांची प्रमुख उपस्थिती होती.



शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पांडुरंग भोपी यांनी गोल्डन ग्रुप पदाधिकारी व सदस्यांचे स्वागत केले.गोल्डन ग्रुपचे अध्यक्ष वसंत भगत आणि आधारस्तंभ निळकंठ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली हे वाटप संपन्न झाले. गोल्डन ग्रुपच्या वतीने रीटघर शाळेतील १६१ विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना बटन छत्रीचे वाटप करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना वह्या पेन, पेन्सिल, खोडरबर,शार्पनर, पट्टी असे शैक्षणिक साहित्य प्रदान करण्यात आले. सरपंच सुभाष भोपी यांनी गोल्डन ग्रुप करत असलेल्या समाजकार्याबद्दल आणि रिटघर राजिप शाळेत छत्री वाटप केल्याबद्दल या संस्थेची प्रशंसा केली तसेच आगामी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. गोल्डन ग्रुपचे सदस्य मंदार दोंदे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मित्र आणि मैत्री जपण्याचा कानमंत्र दिला. प्रत्येकाने आपल्या आयुष्यात आई–वडील, शिक्षक आणि मित्र हे जपलेच पाहिजेत असे सांगीतले

## रत्नागिरीकर सामाजिक प्रतिष्ठान करंजाडेमध्ये सहभागाचे आवाहन

**उरण : बातमीदार**

प्रत्येक जिल्ह्यात वेगवेगळ्या विविध सामाजिक संस्था संघटना कार्यरत आहेत.जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी व परिसरातील समाज बांधवांच्या विकासासाठी या विविध सामाजिक संस्था संघटना झटत असतात. रत्नागिरी जिल्ह्यातील विविध समाज बांधव, नागरिकांची एक सामाजिक संस्था असावी या दृष्टीकोणातून रत्नागिरीकर सामाजिक प्रतिष्ठान करंजाडे पनवेल या संस्थेची स्थापना झाली असून रत्नागिरी जिल्ह्यातील नागरिकांनी सामाजिक बांधिलकी जपत या संघटनेत मोठया संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन या संघटनेतर्फे रत्नागिरी जिल्ह्यातील नागरिकांना अर्थातच रत्नागिरीकरांना केले आहे.

संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत गुजर यांनी तसेच सर्व पदाधिकारी सदस्यांनी आवाहन केले की बांधवांनो, आपण करंजाडेत संख्येने कमी असलो तरी आपल्यातील गुणवत्तेच्या जोरावर सर्वांनी एकत्र येऊन आपल्या विचारांची मोठ बांधली तर, आपण योजिलेले अनेक उद्धेश तडीस नेऊ शकतो यात शंका नाही. त्याकरिता केवळ मनाचा निश्चय करणे गरजेचे आहे आणि तो फक्त आपल्या निर्णयाच्या एका क्लिकवर अवलंबून आहे. तर, चला आपले रत्नागिरीकर बांधव करंजाडेत कोठे आहेत ते शोधूया आणि त्यांना ह्या प्रवाहात आणूया असे आवाहन रत्नागिरीकर संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत महादेव यांनी केले आहे.

## शिक्षण विभागातील कंत्राटी कामगारांच्या वेतन कपातीविरोधात उपायुक्तांना निवेदन

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामध्ये कार्यरत कंत्राटी कामगारांच्या उन्हाळी, दिवाळी, गणेशोत्सव तसेच इतर शालेय सुट्ट्यांमधील वेतन कपातीचा प्रश्न गंभीर बनला असून यासंदर्भात भाजपाचे माजी नगरसेवक विशाल डोळस यांनी शिक्षण उपायुक्त यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.



सदर निवेदनामध्ये शिक्षण विभागातील कंत्राटी कामगारांना सुट्ट्यांच्या कालावधीत वेतनापासून वंचित ठेवले जात असल्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. नियमित शिक्षकांना सुट्टीच्या काळात पूर्ण वेतन मिळत असताना तसेच महानगरपालिकेच्या इतर विभागांतील अनेक कंत्राटी कामगारांच्या वेतनात कपात होत नसताना केवळ शिक्षण विभागातील कंत्राटी कामगारांवर अन्यायकारक निकष लावले जात असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला.

यावेळी कंत्राटी कामगारांच्या हितासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने नवीन धोरण तयार करावे तसेच कंत्राटदारांसोबत करण्यात येणाऱ्या करारातील अटींमध्ये आवश्यक दुरुस्ती करून कामगारांच्या सुट्ट्यांमधील वेतन कपात कायमस्वरूपी बंद करावी, अशी मागणी करण्यात आली.

शिक्षण उपआयुक्तांनी सदर विषयाची दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# गव्हाण विद्यालयात अमली पदार्थविरोधी जनजागृती

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज मध्ये गुरुवार दिनांक २५ जून २०२६ रोजी ' निरोगी युवक,सशक्त भारत ' हा संदेश प्रसारित करण्यासाठी अंमली पदार्थ विरोधी जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले. नवी मुंबई पोलीस आयुक्तालया अंतर्गत उलवे पोलीस स्टेशनच्या वतीने संपन्न झालेल्या या शिबिरात विद्यार्थ्यांना अंमली पदार्थाचे सेवन करणार नाही, व्यसनाच्या आहारी जाणार नाही अशी नशा मुक्तीची शपथ देण्यात आली.



## नशामुक्त भारत २०२६ अभियानाचा जागर

उलवे पलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक कृष्णा पाटील यांनी पी.पी.टी. द्वारे समुपदेशन करताना अंमली पदार्थ व्यक्ती च्या मेंदूवर व शरीरावर परिणाम करून व्यसनाधीन करतात असे प्रतिपादन करून विद्यार्थी व्यसनाच्या आहारी का जातात ह्या प्रश्नाच्या उत्तरार्थ सविस्तर विश्लेषण केले.अंमली पदार्थांचे शारीरिक,मानसिक व सामाजिक दुष्परिणाम विशद करून याविषयी अधिक मार्गदर्शन करताना व्यसनाची लक्षणे, कायदेशीर परिणाम NDPS, Act १९८५ याबद्दल माहिती सांगून संशयास्पद बाबी आढळल्यास त्वरित शिक्षक,पालक व पोलिसांच्या निदर्शनास आणावे असे आवाहन त्यांनी केले.

" व्यसनाला नकार द्या – नशा मुक्त भारत २०२८ साकार करा " अशा उद्घोषणांसह नशा मुक्त भारत २०२८ अभियानांतर्गत अंमली पदार्थांविषयी जनजागृती करून व्यसनमुक्त,निरोगी आणि सुरक्षित भारत घडविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

उलवे पोलिस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक कृष्णा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व अनिवासी रयत गुरुकुल अंतर्गत संपन्न झालेल्या या समुपदेशन शिबिरास पोलीस उपनिरीक्षक दिपक करांडे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अशोक साळवे, पोलीस कॉन्स्टेबल विश्वनाथ पाटील पो. हवालदार मोकल मॅडम, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,रवींद्र भोईर, संदीप भोईर, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख संजय उगले, माध्यमिक व ज्युनिअर कॉलेज शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# सावळे ग्रामपंचायतीत एकल दिवस उत्साहात साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सावळे ग्रामपंचायतीच्या वतीने 'एकल दिवस' उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात एकल महिलांचा सन्मान करत त्यांना छत्री वाटप करण्यात आले. तसेच रायगड जिल्हा परिषद सदस्या सौ. अनन्या अविनाश गाताडे यांच्या तर्फे महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले.

यावेळी सौ. रंजना वास्कर, सभापती, पनवेल पंचायत समिती यांनी महिलांशी संवाद साधत शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. अनन्या अविनाश गाताडे यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

या कार्यक्रमास सरपंच प्रशांत माळी, माजी सरपंच सुनील माळी, शिवाजी माळी, संजय केदारी, माजी उपसरपंच प्रगती जांभुळकर, माजी सदस्या सुरेखा कुरंगळे, ज्येष्ठ कार्यकर्ते मारुती माळी, ग्रामसेवक विनायक कांबळे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन सावळे ग्रामपंचायतीने केले असून उपस्थितांनी या सामाजिक उपक्रमाचे स्वागत करत आयोजकांचे कौतुक केले. महिलांना आवश्यक वस्तूंचे वाटप करून त्यांचा सन्मान करण्यात आल्याने कार्यक्रमाला सामाजिक बांधिलकीची विशेष छटा लाभली.





# वाड्या-वस्त्यांवर योजनांचा लाभ पोहचवा

## रायगड जि.प. सभापती वैकुंठ पाटील यांचे निर्देश

**पाली : प्रतिनिधी**

जिल्हा पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीची बैठक बुधवारी सुधागड पंचायत समितीच्या कै . नामदेवशेठ खैरे सभागृहात समितीचे सभापती वैकुंठ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. पशुसंवर्धन विभागाच्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी अधिकारी, कर्मचारी व लोकप्रतिनिधींनी संयुक्तपणे गावागावात जाऊन काम करावे, असे निर्देश यावेळी देण्यात आले. बैठकीस सुधागड पंचायत समितीच्या सभापती तथा समिती सदस्या जागृती मानकर, सदस्या पल्लवी भोईर, सदस्य जनार्दन भस्मा, सदस्य महेश म्हात्रे, सदस्या प्रणाली शेठ, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सचिन देशपांडे तसेच विभागाचे अधिकारी उपस्थित होते.यावेळी सभापती वैकुंठ पाटील यांनी सुधागड तालुक्यासाठी महत्त्वपूर्ण घोषणा करत दोन नवीन पशुवैद्यकीय दवाखाने मंजूर झाल्याची माहिती दिली. पशुपालकांची वाढती गरज लक्षात घेऊन या दवाखान्यांमुळे दुर्गम भागातील शेतकरी व पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.




पाटील म्हणाले की, पशुसंवर्धन विभागाकडे निधीची कमतरता असल्याचा समज आता दूर झाला आहे. पूर्वी ३५० ते ४०० कोटी रुपयांचा निधी असलेल्या विभागाला आता सुमारे ४,५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होत आहे. त्यामुळे योजनांचा लाभ अधिकाधिक शेतकरी व पशुपालकांपर्यंत पोहोचविणे ही सर्वांची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सुधागडासाठी विशेष मोहीम सुधागड तालुक्यात मोठ्या प्रमाणावर आदिवासी व दुर्गम वस्ती असल्याने या भागात विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले. अधिकारी, सभापती आणि सदस्यांनी प्रत्यक्ष वाड्या–वस्त्यांवर जाऊन लाभार्थी शोधावेत, अर्ज भरून घ्यावेत आणि योजनांची माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले."मला कागदोपत्री काम नको, प्रत्यक्ष परिणाम हवेत. सुधागड तालुक्यातून सर्वाधिक लाभार्थी मिळाले पाहिजेत," असे स्पष्ट शब्दांत वैकुंठ पाटील पशुवैद्यकीय अधिकारी यांना सांगितले. आत्मनिर्भरतेसाठी पशुसंवर्धन महत्त्वाचे देशाला अन्नधान्य आणि दूध उत्पादनात आत्मनिर्भर बनविण्यासाठी पशुसंवर्धन क्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावत आहे. केंद्र व राज्य शासनाकडून उपलब्ध होणारा निधी थेट शेतकरी आणि पशुपालकांपर्यंत पोहोचला पाहिजे. भविष्यातील अन्नसुरक्षा आणि दुग्धउत्पादन वाढीसाठी पशुसंवर्धन विभागाने अधिक वेगाने काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. दोन दिवसांत लँपी लसीकरण सुरू जिल्ह्यात लँपी स्कीन डिसीज प्रतिबंधक लस उपलब्ध झाल्याची माहिती देत पुढील दोन दिवसांत सर्व तालुक्यांत लसीकरण शिबिरे आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले. शिबिरांमध्ये स्थानिक सरपंच, पंचायत समिती सदस्य व लोकप्रतिनिधींना सहभागी करून जनजागृती वाढविण्याचे आवाहन करण्यात आले. एक कोटी चाळीस लाखांचा निधी उपलब्ध यावेळी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सचिन देशपांडे यांनी जिल्हा परिषदेमार्फत एक कोटी चाळीस लाख रुपयांची तरतूद उपलब्ध असल्याची माहिती दिली.

**शेतकरी आणि पशुपालकांचा शासकीय योजनांकडे पाहण्याचा दृष्टिकोन आजही काही प्रमाणात संभ्रमाचा आहे. अनेकदा त्यांना वाटते की कागदपत्रांची पूर्तता करूनही लाभ मिळेल की नाही. अर्ज मंजूर होईल की नाही किंवा योजना प्रत्यक्षात आपल्यापर्यंत पोहचेल की नाही. त्यामुळे अनेक पात्र लाभार्थी योजनांपासून वंचित राहतात. हा संभ्रम दूर करणे आणि शेतकरी, पशुपालकांमध्ये विश्वास निर्माण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. यासाठी केवळ कार्यालयीन कामकाज पुरेसे नाही. अधिकारी आणि कर्मचारी यांनी लोकप्रतिनिधींना सोबत घेऊन गावागावांत, वाड्या–वस्त्यांवर जाऊन जनजागृती केली पाहिजे.**
**–वैकुंठ पाटील, सभापती,**
**कृषी व पशुसंवर्धन, राजिप**

# अंबा नदीपात्रात बुडालेल्या ट्रक चालकाचा मृतदेह शोधण्यात यश

## सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ संस्थेच्या बचाव पथकाची कामगिरी

**पाली : प्रतिनिधी**

मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वाकण पुलाजवळील अंबा नदीपात्रात बुडालेल्या परप्रांतीय ट्रक चालकाचा मृतदेह शोधण्यात सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था च्या बचाव पथकाला यश आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार रविवारी (ता. २१) नागोठणे पोलीस ठाण्यामार्फत सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेच्या बचाव पथकाला अंबा नदीपात्रात एक व्यक्ती बुडाल्याची माहिती प्राप्त झाली. घटनेचे गांभीर्य ओळखून सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेचे सदस्य तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास शोध व बचाव मोहीम युद्धपातळीवर सुरू करण्यात आली. नदीपात्रातील पाण्याचा अंदाज घेऊन आणि परिस्थितीचा आढावा घेऊन बचाव पथकाने 'फ्री स्टाईल सर्च' तंत्राचा वापर केला. अत्यंत कठीण परिस्थितीतही पथकातील सदस्यांनी जीवाची पर्वा न करता शोधकार्य सुरू ठेवले. त्यांच्या या अथक प्रयत्नांना अवघ्या १५ मिनिटांत यश आले आणि बुडालेल्या ट्रक चालकाचा मृतदेह नदीपात्राबाहेर काढण्यात आला.

मृतदेह बाहेर काढल्यानंतर तो पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी नागोठणे पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आला आहे. संबंधित परप्रांतीय ट्रक चालकाची अद्याप ओळख पटलेली नसून, पोलीस प्रशासन त्याबाबतचा पुढील तपास करत आहे. या कठीण शोध मोहिमेत सहभागी झालेल्या सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेच्या सर्व बचाव कर्मचाऱ्यांनी दाखवलेली तत्परता, धाडस आणि व्यावसायिक कौशल्य खरोखरच वाखाणण्याजोगी आहे. त्यांच्या त्वरित प्रतिसादामुळेच मृतदेह वेळेत शोधणे शक्य झाले.



# धामणसई विद्यालयातील ७५ गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**धाटाव : प्रतिनिधी**

श्री साईनाथ दरबार सामाजिक सेवा संस्था, खोपोली व मठाधीश श्री श्री श्री १००८ महंत योगी भाईनाथजी महाराज यांच्या वतीने यशवंत विद्यापीठ, कराड संचलित रामभाऊ महादेव वागळे विद्यालय, धामणसई (ता. रोहा) येथे सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.


या उपक्रमांतर्गत विद्यालयातील अनाथ, होतकरू, आर्थिकदृष्ट्या दुर्बल तसेच आदिवासी बहुल समाजातील ७५ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, छत्री, कंपास बॉक्स, १०० व २०० पानांच्या वह्या, नोटबुक, पेन, पेन्सिल, शार्पनर, रबर तसेच रोख रक्कम देऊन शैक्षणिक मदत करण्यात आली.

यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. पी. डुबल, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान मुख्याध्यापक डुबल यांनी महाराजांना पिंगळसई केंद्रातील इतर शाळांनाही शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याची विनंती केली. यावर महंत योगी भाईनाथजी महाराज यांनी सकारात्मक प्रतिसाद देत पुढील शैक्षणिक वर्षात पिंगळसई केंद्रातील काही शाळांमध्येही अशाच प्रकारचे शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळाल्याने मुख्याध्यापक डुबल यांनी समाधान व्यक्त करत श्री साईनाथ दरबार सामाजिक सेवा संस्था व महंत योगी भाईनाथजी महाराज यांचे आभार मानले.

# जिल्ह्यात २८ जून रोजी शिक्षक पात्रता परीक्षा

**रायगड : अलिबाग**




महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET)–2026 चे आयोजन रविवार, दि. 28 जून रोजी करण्यात आले असून जिल्ह्यात एकूण 9 परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा होणार आहे. जिल्ह्यात पेपर–1 साठी 4 हजार 432 आणि पेपर–2 साठी 5 हजार 771 असे एकूण 10 हजार 203 उमेदवार परीक्षा देणार आहेत.

परीक्षा पारदर्शक आणि गैरप्रकारमुक्त वातावरणात पार पडावी यासाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून अत्याधुनिक सुरक्षा व्यवस्था लागू करण्यात आली आहे. सर्व परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे, बायोमेट्रिक पडताळणी, फेस रेकग्निशन, हँड हेल्ड मेटल डिटेक्टरद्वारे तपासणी तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित देखरेख व्यवस्था कार्यान्वित करण्यात येणार आहे.

उमेदवारांनी आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदान ओळखपत्र किंवा ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी एक मूळ फोटो ओळखपत्र सोबत आणणे बंधनकारक आहे. मोबाईल, स्मार्ट वॉच, कॅल्क्युलेटर व इतर इलेक्ट्रॉनिक साहित्य परीक्षा केंद्रात नेण्यास मनाई करण्यात आली आहे. पेपर–1 साठी सकाळी 8.30 वाजेपर्यंत तर पेपर–2 साठी दुपारी 12.30 वाजेपर्यंत परीक्षा केंद्रावर उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

गैरप्रकार रोखण्यासाठी प्रश्नपत्रिकांवर युनिक नंबर व क्यूआर कोड असणार असून उत्तरपत्रिकेसोबत कार्बन प्रती देण्यात येणार आहेत. तसेच संचालक, सहसंचालक व उपसंचालक दर्जाच्या अधिकाऱ्यांची भरारी पथके प्रत्येक जिल्ह्यात नियुक्त करण्यात आली आहेत.दिव्यांग उमेदवारांना लेखनिकाची सुविधा उपलब्ध असून त्यासाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची पूर्वपरवानगी आवश्यक आहे. परीक्षेसंदर्भातील माहिती व सूचनांसाठी उमेदवारांनी केवळ महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळांवरील माहितीलाच प्राधान्य द्यावे आणि अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

# राजेश काफरे यांचे उपोषण मागे : आमदार अनिकेत तटकरे यांचे आश्वासन

**रोहा : प्रतिनिधी**

गेले तीन दिवस रोहा अष्टमी नगरपरिषद येथे नगरपरिषदेने वाढवलेल्या पाणीपट्टी वाढीच्या विरोधात शिवसेना (उबाठा) शहर प्रमुख राजेश कापरे हे उपोषणाला बसले होते. गेली दोन दिवस नगरपरिषद व राजेश कापरे यांच्या शिष्टमंडळामध्ये चर्चा झाली परंतु फलित काही निघाले नव्हते. आमदार अनिकेत तटकरे यांनी राजेश काफरे यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधल्यानंतर अखेर तिसऱ्या दिवशी राजेश काफरे यांनी उपोषण मागे घेतले. नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी नारळाचे पाणी दिल्यानंतर राजेश काफरे यांचे उपोषण सोडण्यात आले.



यावेळी नगराध्यक्ष वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, गटनेते महेंद्र गुजर, नगर परिषद सभापती मयूर दिवेकर, महेश कोलाटकर, नीता हजारे, रवी चाळके, पोलिस निरीक्षक मारुती पाटील, नगरसेवक अजित मोरे, प्रशांत कडु, मणेर, माज सवाल, शिवसेना जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, तालुकाप्रमुख नितीन वारंगे, उपतालुकाप्रमुख दुर्गेश नाडकर्णी, मनोज लांजेकर, प्रीतम देशमुख, चंद्रकांत कडु, भारत वाकचौरे, ओंकार गुरव, प्रशांत देशमुख, सागर भगत आदी उपस्थित होते.

रोहा अष्टमी नगर परिषदेच्यावतीने वाढीव पाणीपट्टीच्या विरोधात राजेश कापरे यांनी आमरण उपोषण सुरू केले होते या संदर्भात आ.अनिकेत तटकरे यांच्या आश्वासनानंतर राजेश काफरे यांचे उपोषण सोडण्यात आले. दूरध्वनीवरून राजेश काफरे यांच्याशी आमदार अनिकेत तटकरे यांची या विषयासंदर्भात चर्चा झाली त्यामुळे राजेश काफरे यांनी उपोषण मागे घेतले आहे.

पाणीपट्टी या विषयावर तोडगा काढण्यासंदर्भात नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांचे राजेश काफरे यांना लेखी पत्र दिले आहे. या पत्रात आपण नळपट्टी वाडी विरोधात २२/०६/२०२६ पासून उपोषणाला बसलेले अहात. श्री.अनिकेतभाई तटकरे, आमदार, कोकण स्थानिक स्वराज्य संस्था यांचेशी मोबाईल ऑडीओ/व्हिडीओ कॉल द्वारे सदर पाणीपट्टी वाढीबाबत सकारात्मक चर्चा झाली आहे. तसेच नामदार कु. अदितीताई वरदा सुनिल तटकरे, मंत्री, महिला व बाल कल्याण व आमदार अनिकेत तटकरे हे शनिवार दिनांक २७–०६–२०२६ रोजी आपली प्रत्यक्ष भेट घेऊन योग्य तो तोडगा काढणे बाबत आपलेशी संभाषण झाले आहे.तरी आपण आपले उपोषण मागे घेणेस विनंती करण्यात येत आहे. हे नमूद करण्यात आले आहे.

**रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वाढीव पाणीपट्टीसंदर्भात आपण प्रत्यक्ष भेटून चर्चेतून तोडगा काढणार असल्याचे आमदार अनिकेत तटकरे यांनी दूरध्वनीवरून सांगितले आहे. त्यामुळे मी उपोषण सोडले आहे. रोहेकरांच्या हिताच्या दृष्टिकोनातून योग्य तोडगा निघेल अशी अपेक्षा आहे.**
**–राजेश काफरे**

तिसऱ्या दिवशी या उपोषणास जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील यांनी भेट देत राजेश काफरे यांच्याशी चर्चा करून योग्य ते तोडगा काढण्यासंदर्भात भूमिका घेतली होती.

# निष्ठा म्हात्रे ९४.२४ टक्के गुणांसह कॉलेजमध्ये अव्वल

**नागोठणे : बातमीदार**

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या 2026च्या उन्हाळी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून एच.ओ.सी. पिल्लई इंजिनिअरिंग कॉलेजची विद्यार्थिनी तथा उरण येथील रहिवासी निष्ठा जितेश म्हात्रे हिने डिप्लोमा इन कॉम्प्युटर इंजिनिअरिंग परीक्षेत 94.24 टक्के गुण मिळवून महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर इंजिनिअरिंग शाखेत प्रथम क्रमांक पटकावला आहे.



निष्ठा हिने 850 पैकी तब्बल 801 गुण मिळवत हे उल्लेखनीय यश संपादन केले. तिच्या या यशामुळे कुटुंबीयांसह उरण व रायगड जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

निष्ठा ही उरण शहर काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष तसेच रायगड जिल्हा पर्यावरण विभागाचे सरचिटणीस जितेश म्हात्रे यांची कन्या आहे. तसेच सिमेन्स कंपनी (कळवा) येथून सेवानिवृत्त झालेले प्रमोद मुकादम, राष्ट्रवादी काँग्रेसचे नागोठणे विभागीय नेते दिलीप टके आणि सामाजिक कार्यकर्ते हरीश टके यांची ती नात आहे.

निष्ठाने उरण येथील नामांकित सेंट मेरीज कॉन्व्हेंट स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमधून दहावीचे शिक्षण पूर्ण केले असून दहावीच्या परीक्षेत तिने 90.40 टक्के गुण मिळविले होते. शैक्षणिक क्षेत्रातील तिची सातत्यपूर्ण प्रगती आणि मेहनतीच्या जोरावर तिने हे यश मिळविले आहे.

निष्ठा हिच्या यशामागे आई पूनम म्हात्रे व वडील जितेश म्हात्रे यांचे मोलाचे मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि पाठबळ लाभल्याचे सांगण्यात येते. निष्ठा म्हात्रे हिच्या या उज्ज्वल यशाबद्दल रायगड जिल्हा काँग्रेसचे माजी अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते महेंद्र घरत यांनी तिचे अभिनंदन करून उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व आशीर्वाद दिले आहेत.

# श्रीवर्धन तालुक्यात गुटख्याची अवैध विक्री ; दुग्धजन्य पदार्थ, मिठाईचीही तपासणी करण्याची मागणी

**श्रीवर्धन : बातमीदार**

काही महिन्यांपूर्वी श्रीवर्धन तालुक्यामध्ये अवैध विक्री सुरू असलेल्या गुटख्याविरोधात पत्रकारांनी जोरदार आवाज उठवून बातम्या प्रसिद्ध केल्यानंतर रायगड पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार श्रीवर्धन पोलिसांनी कारवाई करून गुन्हे दाखल केले होते, मात्र तालुक्यात प्रतिबंधित असलेल्या गुटख्याची अवैध विक्री सुरूच आहे.

याचबरोबर विविध कंपन्यांचे दही, दूध, लस्सी, ताक, पनीर विक्रीसाठी बाजारात येत असते. चिप्स, कुरकुरे व इतर चटपटीत पदार्थ असतात, पण मागील अनेक वर्षांपासून अशा दुग्धजन्य पदार्थांची कोणत्याही प्रकारची तपासणी करण्यात आलेली नाही. मिठाईच्या दुकानांमध्ये विक्रीसाठी ठेवलेल्या मिठाईवर कोणत्याही प्रकारचे दरपत्रक व मिठाई बनवलेल्याची तारीख लावलेली दिसत नाही.


कर्तव्यदक्ष सनदी अधिकारी तुकाराम मुंडे यांनी अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात अवैध गुटखा तसेच भेसळयुक्त पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर कारवाया सुरू केल्या आहेत. तशाच प्रकारे श्रीवर्धनमध्येही तपासणी व्हावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# 'वेगावर नियंत्रण ठेवून वाहन चालवा'

**माणगाव : प्रतिनिधी**

पाऊस सुरु झाला आहे. त्यामुळे वाहनचालकांनी वेगावर नियंत्रण ठेवून वाहन चालवून आपला प्रवास सुखकर, सुरक्षित व आनंदायी करा, असे आवाहन माणगावच्या नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे यांनी केले आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नगराध्यक्ष सुर्वे यांनी असे म्हटले आहे की, सुरुवातीचा पाऊस विशेषकरून वाहनचालकांसाठी धोकादायक असतो, कारण उन्हाळ्याच्या दिवसात रस्त्यांवर अनेक ठिकाणी वाहनांचे ऑइल पडलेले असते. तसेच भरावासाठी डंपरमधून जाणारी माती रस्त्यावर पडलेली असते. यावरून दुचाकी खासकरून घसरतात तसेच चारचाकीचेही लहान–मोठे अपघात होत असतात. या गोष्टीकडे चालकांनी विशेष लक्ष देऊन प्रवास कसा सुखकर होईल याची काळजी घेणे आवश्यक आहे.



**मुरूड : पाऊस पडल्याने शिवारांचे रूप आता पालटू लागले आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

# द. आफ्रिकेची ऐतिहासिक कामगिरी

## प्रथमच फिफा वर्ल्डकपच्या बाद फेरीत धडक

**ग्वादालुपे : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेने रोमांचक सामन्यात दक्षिण कोरियाचा १-०ने पराभव करत विश्वचषकाच्या बाद फेरीत प्रथमच प्रवेश केला. या विजयामुळे दक्षिण आफ्रिकेच्या फुटबॉल इतिहासात एक नवीन अध्याय लिहिला गेला आहे.

सामन्याच्या ६३व्या मिनिटाला थापेलो मासेकोने गोल करत दक्षिण आफ्रिकेला आघाडी मिळवून दिली. त्शेपांग मोरेमीच्या अचूक क्रॉसवर मासेकोने आपल्या डाव्या पायाने चेंडू थेट गोलजाळ्यात धाडला. सामन्यात पाच शॉट्स मारणाऱ्या मासेकोसाठी हा पहिलाच विश्वचषक गोल ठरला, ज्याने त्याला स्पर्धेतील महत्त्वाचा खेळाडू बनवले आहे.




१९९८, २००२ आणि २०१०च्या विश्वचषकात गट फेरीतच बाहेर पडलेल्या 'बाफाना बाफाना' संघाने यावेळी मेक्सिकोपाठोपाठ 'अ' गटात दुसरे स्थान पटकावले आहे. प्रशिक्षक ह्यूगो ब्रूस यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने दाखवलेली जिद्द आणि सांघिक कामगिरी कौतुकास्पद ठरली.

या विजयावर प्रतिक्रिया देताना दक्षिण आफ्रिकेचे मुख्य प्रशिक्षक ह्यूगो ब्रूस या गटाची मानसिकता अप्रतिम आहे. प्रत्येकजण एकमेकांसाठी खेळत आहे. माझ्या कारकिर्दीच्या या टप्प्यावर हा विजय मिळवणे हे कोणत्याही प्रशिक्षकासाठी स्वप्नवत आहे.

बाद फेरीत दक्षिण आफ्रिकेचा सामना कॅनडाशी होणार आहे. हा नॉकआऊट सामना रविवारी कॅलिफोर्नियातील इंग्लेवुड येथे खेळला जाईल. दुसरीकडे दक्षिण कोरियाचे प्रशिक्षक हाँग म्युंग-बो यांनी स्टार खेळाडू सोन ह्युंग-मिनला बदली खेळाडू म्हणून उतरवण्याचा घेतलेला निर्णय चर्चेचा विषय ठरला. या पराभवानंतरही इतर सामन्यांच्या निकालावर दक्षिण कोरियाचे बाद फेरीतील भवितव्य अवलंबून आहे.

## आगामी वर्ल्डकपबाबत मेस्सीने मौन सोडले!

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**



फुटबॉलविश्वातील महान खेळाडूंपैकी एक असलेल्या लिओनेल मेस्सी याने २०३० फिफा विश्वचषकात खेळण्याबाबत अखेर आपली भूमिका स्पष्ट केली आहे. सध्या सुरू असलेल्या विश्वचषक स्पर्धेत अर्जेंटिनासाठी दमदार कामगिरी करणाऱ्या मेस्सीने भविष्यातील योजनांबाबत प्रतिक्रिया देताना आपण सध्या वर्तमानावर लक्ष केंद्रित करत असल्याचे सांगितले.

३८ वर्षीय मेस्सीच्या नेतृत्वाखाली गतविजेते अर्जेंटिना राष्ट्रीय फुटबॉल संघ यांनी विश्वचषक २०२६मध्ये शानदार सुरुवात केली आहे. अल्जेरियाविरुद्धच्या पहिल्याच सामन्यात मेस्सीने हॅट्ट्रिक झळकावत अर्जेंटिनाला ३-० असा विजय मिळवून दिला. त्यानंतर ऑस्ट्रियाविरुद्धच्या सामन्यात त्याने दोन गोल करत संघाच्या २-० विजयात मोलाची भूमिका बजावली. या दोन सामन्यांमधील पाचही गोल मेस्सीच्या नावावर जमा झाले असून त्याने विश्वचषकातील एकूण गोलसंख्या १८वर नेली आहे. यासह तो फिफा विश्वचषक इतिहासातील सर्वाधिक गोल करणारा पुरुष फुटबॉलपटू ठरला आहे.

आगामी २०३० विश्वचषकात खेळण्याबाबत विचारले असता मेस्सी म्हणाला, मी अजून काही काळ खेळत राहीन. जोपर्यंत मी संघासाठी योगदान देऊ शकतो, शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त आहे आणि सहकाऱ्यांना मदत करू शकतो, तोपर्यंत मैदानावर उतरत राहीन, मात्र २०३० विश्वचषकाबाबत त्याने कोणतीही ठोस हमी दिली नाही. "सध्या मी त्याबद्दल विचार करत नाही. तो अजून खूप दूरचा विषय आहे. मी एकावेळी एक दिवस जगतो आणि सध्या फक्त वर्तमानावर लक्ष केंद्रित करत आहे," असे मेस्सीने स्पष्ट केले.



## नागोठणे विभागातील १० खेळाडूंची राष्ट्रीय पिंच्याक सिलॅट स्पर्धेसाठी निवड

**नागोठणे : बातमीदार**

नाशिक येथे २५ ते २८ जूनदरम्यान आयोजित करण्यात आलेल्या १४व्या ज्युनिअर राष्ट्रीय पिंच्याक सिलॅट स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघामध्ये रायगड जिल्ह्याच्या नागोठणे विभागातील तब्बल १० खेळाडूंची निवड झाली आहे.

पिंच्याक सिलॅट हा इंडोनेशियाचा पारंपरिक मार्शल आर्ट्स खेळ असून तो पाच विविध प्रकारांमध्ये खेळला जातो. या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंमध्ये श्रीयश शेडगे (नागोठणे), रियांश सारले (वरवटणे), जय गोळे (नागोठणे), शौर्य धसाडे (वणी), राकेश पवार (वेलशेत), प्रीत माळी (आंबेघर), जय कुलकर्णी (नागोठणे), शिवशांत सारगे (नागोठणे), प्रांजळ खारपुडे (नागोठणे) आणि अनिश पालकर (नागोठणे) यांचा समावेश आहे.

या सर्व खेळाडूंना पिंच्याक सिलाटचे प्रशिक्षक मास्टर धनंजय जगताप यांचे मार्गदर्शन लाभले. महाराष्ट्र संघात निवड झालेल्या या खेळाडूंचे नागोठणे विभागासह संपूर्ण रायगड जिल्ह्यातून अभिनंदन होत असून राष्ट्रीय स्पर्धेतील यशासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## स्टार फुटबॉलपटू अलिशा लेहमन लवकरच चढणार बोहल्यावर!

### बीचवरील प्रपोजलचे फोटो व्हायरल



**बर्न : वृत्तसंस्था**

फुटबॉल विश्वातील सर्वाधिक लोकप्रिय आणि ग्लॅमरस महिला खेळाडूंमध्ये गणली जाणारी स्वित्झर्लंडची स्टार फुटबॉलपटू अलिशा लेहमन हिने चाहत्यांना आनंदाची बातमी दिली आहे. अलिशाने तिचा प्रियकर आणि रिॲलिटी शो 'लव्ह आयलंड'चा स्टार मॉन्टेल मॅकेन्झी याचा लग्नाचा प्रस्ताव स्वीकारला असून लवकरच हे जोडपे विवाहबंधनात अडकणार आहे.


अलिशाने सोशल मीडियावर तिच्या एंगेजमेंटचे काही खास फोटो शेअर केले. समुद्रकिनाऱ्यावर सूर्यास्ताच्या मनमोहक वातावरणात मॉन्टेलने तिला प्रपोज केले. या रोमँटिक क्षणाचे फोटो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत असून चाहत्यांकडून या जोडप्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

२७ वर्षीय अलिशा लेहमनने इन्स्टाग्रामवर पोस्ट केलेल्या छायाचित्रांमध्ये मॉन्टेल मॅकेन्झी गुडघ्यावर बसून तिच्या बोटात अंगठी घालताना दिसत आहे. या खास क्षणी अलिशा भावूक झाल्याचेही फोटोंमधून स्पष्टपणे दिसून येते. फोटो शेअर करताना तिने "Forever and Always" असे कॅप्शन दिले आहे.

## असीम मदीबोवर पाच सामन्यांची बंदी; 'फिफा'ची कडक कारवाई

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक स्पर्धेदरम्यान घडलेल्या एका धक्कादायक घटनेने फुटबॉलविश्व हादरले. कतारचा मिडफिल्डर असिम मदिबो याने कॅनडाच्या २४ वर्षीय इस्माईल कोनेवर केलेल्या धोकादायक टॅकलमुळे कोने गंभीर जखमी झाला असून त्याचा पाय तुटला. या घटनेची दखल घेत 'फिफा'ने मदिबोवर पाच सामन्यांची बंदी घातली आहे. ही घटना व्हँकुव्हरमधील बीसी प्लेस स्टेडियमवर कॅनडा आणि कतार यांच्यात झालेल्या विश्वचषक सामन्यात घडली.



या सामन्याच्या ५३व्या मिनिटाला मदिबोने मागून येत इस्माईल कोनेवर धोकादायक टॅकल केले. याची मैदानातील पंचांनी तत्काळ दखल घेत हा गंभीर फाऊल मानत मदिबोला रेड कार्ड दाखवले आणि मैदानाबाहेर पाठवले, मात्र या टॅकलमध्ये कोनेच्या डाव्या पायातील दोन हाडे मोडली. मैदानावरच त्याला तातडीने वैद्यकीय मदत देण्यात आली आणि त्यानंतर स्ट्रेचरवरून रुग्णालयात हलवण्यात आले. पुढील उपचारांसाठी त्याच्यावर शस्त्रक्रियाही करण्यात आली. या गंभीर दुखापतीमुळे कोनेचा विश्वचषकातील प्रवास संपुष्टात आला. या घटनेचा सविस्तर आढावा घेतल्यानंतर फिफाने मदिबोला दोषी ठरवत त्याच्यावर पाच सामन्यांची बंदी घातली. फिफाने या निर्णयाला आव्हान देण्याची संधी उपलब्ध असल्याचेही स्पष्ट केले.

विशेष म्हणजे, या घटनेनंतर काही दिवसांनी असिम मदिबोने रुग्णालयात जाऊन इस्माईल कोनेची भेट घेतली. कतार फुटबॉल असोसिएशनने प्रसिद्ध केलेल्या छायाचित्रांमध्ये मदिबो आणि कोने एकमेकांना मिठी मारताना दिसत आहेत. या भेटीचे फोटो व्हायरल झाले असून मदिबोच्या या खिलाडूवृत्तीचे अनेकांनी कौतुक केले आहे.

## मेक्सिकोची झेकियावर ३-०ने एकतर्फी मात

**मेक्सिको सिटी : वृत्तसंस्था**

सह-यजमान मेक्सिकोने अझ्टेका स्टेडियमवर झेकियाचा ३-० असा दणदणीत पराभव करत फिफा विश्वचषकाच्या 'अ' गटात आपला दबदबा कायम ठेवला. तीन सामन्यांत तीन विजय मिळवत मेक्सिकन संघ बाद फेरीत अपराजित आणि 'निर्दोष' प्रवेश करणारा संघ ठरला आहे. या कामगिरीने चार वर्षांपूर्वीच्या कडू आठवणी पुसून काढत मेक्सिकोने पुन्हा एकदा आपल्या चाहत्यांचे मने जिंकली आहेत.

पहिल्या हाफमध्ये मेक्सिकोला लय गवसण्यासाठी थोडा संघर्ष करावा लागला. झेकियाने सुरुवातीच्या मिनिटांत काही आक्रमक चाली रचल्या होत्या, परंतु मेक्सिकोच्या बचावफळीने त्यांना रोखून धरले. दुसऱ्या हाफमध्ये प्रशिक्षक हावियर अगुइरे यांनी केलेल्या बदलानंतर खेळाचे चित्र बदलले.

५५व्या मिनिटाला पदार्पण करणाऱ्या मातेओ चावेझने डाव्या पायाने जोरदार शॉट मारत मेक्सिकोचे खाते उघडले. हा गोल चावेझच्या कारकिर्दीतील अविस्मरणीय क्षण ठरला. त्यानंतर काही मिनिटांतच ज्युलियन क्विनोनेसने झेकियाच्या गोलकीपरकडून झालेल्या चुकीचा फायदा उचलत रिबाउंडवर दुसरा गोल नोंदवला. सामन्याच्या शेवटच्या क्षणी मिडफिल्डर अल्वारो फिदाल्गोने तिसरा गोल करत ३-० असा विजय निश्चित केला.




## वैभव सूर्यवंशीच्या धाकट्या भावाचीही तडाखेबंद खेळी

### एका डावात ठोकल्या १६८ धावा

**समस्तीपूर : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेटमधील उदयोन्मुख युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी सध्या चांगलाच चर्चेत आहे. अवघ्या १५व्या वर्षी त्याची टीम इंडियात निवड झाली असून आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेत त्याच्या आंतरराष्ट्रीय पदार्पणाची सर्वांनाच उत्सुकता आहे. अशातच आता वैभवचा धाकटा भाऊ आशीर्वाद सूर्यवंशीही आपल्या दमदार फलंदाजीमुळे सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

अवघ्या १० वर्षांच्या आशीर्वादने समस्तीपूर येथे झालेल्या एका स्थानिक सराव सामन्यात १६८ धावांची तुफानी खेळी साकारली. त्याच्या या कामगिरीने क्रिकेटविश्वाला चकीत केले. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वीच आशीर्वादने आणखी एका स्थानिक सराव सामन्यात शतक झळकावले होते. त्या सामन्यात त्याने ८७ चेंडूंमध्ये २० चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने १०३ धावा केल्या होत्या.

ऋषभ इलेव्हन आणि रोशन इलेनव्हन यांच्यात झालेल्या या सामन्यात ऋषभ इलेव्हन संघाने प्रथम फलंदाजी करताना ४० षटकांत ७ बाद ३१२ धावांचा डोंगर उभा केला. या मोठ्या धावसंख्येत आशीर्वादचा सिंहाचा वाटा होता. त्याने ११९ चेंडूंमध्ये १९ चौकार आणि सहा षटकारांच्या मदतीने १६८ धावांची शानदार खेळी केली. त्याचा स्ट्राइक रेट १४१.१८ इतका होता.

दरम्यान, आशीर्वादच्या या शानदार खेळीचे कौतुक मोठा भाऊ वैभव सूर्यवंशी यानेही केले आहे. वैभवने आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीवर आशीर्वादचा फोटो आणि सामन्याचे स्कोअरकार्ड शेअर करत त्याचे अभिनंदन केले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com